कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक २८ डिसेंबर २०२२

किंमत ४ ₹

आत्मदहनाच्या इशाऱ्याने खारलॅन्ड ताळ्यावर

पान ३ वर

शून्य कचरा डेपोबाबत अभ्यासकांना उत्सुकता

पान ८ वर

सीमावासियांना ठाम पाठिंबा

। नागपूर । प्रतिनिधी ।

कर्नाटकमधील ८६५ मराठी भाषिक गावांची इंचन इंच जागा महाराष्ट्राची असून सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठिशी महाराष्ट्र सरकार खंबीरपणे उभं असल्याचा ठराव मंगळवारी (२७ डिसेंबर) विधानसभेत एकमतानं मंजूर करण्यात आला. गेल्याच आठवड्यात कर्नाटक सरकारनं सीमाप्रश्नावर एकमताने ठराव मंजूर केला होता. त्यामुळे महाराष्ट्र सरकारवर दबाव वाढला. अखेर विधिमंडळात बेळगाव सीमा प्रश्नावर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. हिवाळी अधिवेशन सुरू झाल्यापासून विरोधकांनी सातत्यानं बेळगाव सीमाप्रश्नाचा मुद्दा उपस्थित केला जात होता. या प्रश्नावर ठराव आणण्याची मागणी केली जात होती.

विधिमंडळात एकमुखी ठराव

कर्नाटक सरकारच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा निषेध करणारा ठराव विधिमंडळात मांडण्यात आला. तो एकमताने मंजूर करण्यात आला. याचबरोबर बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर या शहरांसह सर्वोच्च न्यायालयातील दाव्यातील सर्व गावे कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी

ठरावाचे राजकारण अग्रलेख पान ४

पान २ वर

सीमावासियांसाठी योजना

सीमाभागातील गावांच्या विकासाठी योजनांचे वचन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. मराठी माणसांवरील अन्याय दुर करणार. बेळगाव निपाणीसह ८६५ महाराष्ट्रात सामील करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले. तसेच, १५ वर्ष महाराष्ट्रात वास्तव्यास असल्यास सरकारी नोकरीची संधी देणार. यासोबतच, बलिदान देणाऱ्या कुटुंबाला अर्थिक मदतीची घोषणा केली. कुटूंबाला दरमहा २० हजाराची मदत जाहिर केली. तसेच, सांस्कृतिक शैक्षणिक मदत जाहिर करण्यात आली. यासोबत सीमावरती भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक जागा राखून ठेवणार. असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माहिती दिली.

> सीमाभागातील जे अन्यायग्रस्त मराठी भाषिक, माता-भगिनी आणि बांधव आहेत, त्यांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत, असा ठराव त्यांनी आज मंजूर केला, त्याला साहजिकच आम्ही पाठिंबा दिला. महाराष्ट्राच्या हिताचं जे काही असेल, तिथे दुमत असण्याचं कारण असूच नये या मताचे आम्ही सगळे आहोत आणि म्हणून आम्ही त्याला एकमताने पाठिंबा दिलेला आहे.
>
> – उद्धव ठाकरे, माजी मुख्यमंत्री

ठरावाची जाणीव कर्नाटकाला झाली पाहिजे

आ.जयंत पाटील यांचे ठाम प्रतिपादन

। नागपूर । दिलीप जाधव ।

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्नी मराठी भाषिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत असल्याबाबतचा ठराव विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर करण्यात आला. मात्र या ठरावाची जाणीव कर्नाटक सरकारला झाली पाहिजे असा मत शेकाप आ. जयंत पाटील यांनी मंगळवारी (२७ डिसेंबर) विधानपरिषदेत मांडले.

ते पुढे म्हणाले की, असा ठराव १९६७ साली झाला होता.२४ डिसेंबर २०१४ साली हि ठराव मांडण्यात आला होता. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कार्यकाळात सीमाभाग केंद्रशासित

करावा असा मुद्दा चर्चेला आला होता. याची आठवण यावेळी पाटील यांनी करुन दिली.

यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सीमा प्रश्नी ठराव मांडला आहे. त्याबद्दल मी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो, सीमा भागातील बांधवांना कृषी, पाणी, वीज ,रस्ते, शिक्षण, आणि

पान २ वर

महत्त्वाचे

दोन आठवड्यात कोरोना रुग्णवाढ

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

गेल्या नऊ आठवड्यांमध्ये भारतात कोरोना संसर्गाची (Corona Cases In India) नवीन प्रकरणं दर आठवड्यात कमी होत असताना, गेल्या आठवड्यात कोरोना रुग्णांची संख्या देशात ११ टक्के वाढली आहे. १२ ते १८ डिसेंबर दरम्यान एका आठवड्यात देशात ११०३ रुग्णांची नोंद झाली, तर १९ ते २५ डिसेंबर दरम्यान देशातील कोरोना रुग्णांची संख्या १२१९ वर पोहोचली आहे. महाराष्ट्र, राजस्थान, पंजाब, दिल्ली, उत्तर भारतातील हिमाचल प्रदेश, दक्षिण भारतातील तेलंगणा आणि पूर्व भारतातील ओडिशा या राज्यांचा समावेश आहे.

मुंबईत थंडीत चढउतार सुरु

। मुंबई । प्रतिनिधी ।

उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांची दिशा किंचितशी बदल्याने गेल्या दोन दिवसांपासून मुंबईतील तापमानात एक-दोन अंशाने वाढ झाली असून किमान तापमान सरासरीवर आले आहे. त्यामुळे थंडीचे प्रमाण काहीसे कमी झाले आहे. मात्र, गुरुवारपर्यंत कमाल आणि किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता असून वर्षाखेरीस पुन्हा एकदा हुडहुडी भरणारी थंडी पडण्याची शक्यता आहे. त्यानंतर नववर्षाच्या पहिल्या आठवड्यात कमाल तापमान २६ अंश आणि किमान १४ अंशाच्या आसपास घसरण्याची शक्यता हवामानतज्ज्ञांनी वर्तवली आहे.

सप्तशृंगी गडावर अपघात-३२ जखमी

नाशिक : सप्तशृंग गडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची पिकअप पलटी होऊन ३२ प्रवासी जखमी झाले आहेत. मंगळवारी सकाळच्या सुमारास दाभाडी येथील बंडु गांगुर्डे याच्या पिकअप मधुन सदर भाविक सप्तशृंग गडावर दर्शनासाठी जात होते.

जिल्हाधिकारी कार्यालयात २५३ रिक्तपदे

। अलिबाग । भारत रांजणकर ।

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात महत्वाची अनेक पदे रिक्त असल्याने अनेक अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त पदभार सोपवावे लागत असल्याने कामाचा प्रचंड ताण असल्याने रिक्त पदे त्वरीत भरण्याची मागणी केली जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील तब्बल २५३ पदे रिक्त आहेत. यात तिन उपजिल्हाधिकारी आणि एक तहसिलदार पदाचादेखील समावेश आहे. पदे रिक्त असल्याने अनेक कामे देखील रखडली जात असल्याने त्याचा परिणाम जिल्ह्याच्या विकासावर होत आहे.

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात एकुण १ हजार ३१२ पदे मंजुर आहेत. त्यापैकी १ हजार ०५९ पदे भरलेली आहेत. त्यामुळे उर्वरित २५३ पदे ही रिक्तच आहेत. सर्वात महत्वाचे असलेले

अतिरिक्त भारामुळे अधिकाऱ्यांवर ताण

लिपीक १०८, तलाठी ८१ पदे प्रतिक्षेत

उपजिल्हाधिकारी पदासाठी १९ पदे मंजुर आहेत. त्यापैकी १६ पदे भरण्यात आली आहेत. तर ३ पदं रिक्त आहेत. यात नव्यानेच रिक्त झालेले जिल्हा पुरवठा अधिकारी, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन, उपजिल्हाधिकारी पुर्नवसन, भुसंपादन समन्वयक उपजिल्हाधिकारी ही पदे रिक्त आहेत. या पदांपैकी नुकतेच रिक्त झालेले जिल्हा पुरवठा अधिकारी या महत्वपुर्ण पदाचा कार्यभार सध्या निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे गेली दोन वर्षांहुन अधिक काळ जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी या पदाचा देखील अतिरिक्त पदभार आहे. सामान्य प्रशासन आणि पुर्नवसन विभागाचा अतिरिक्त पदभार भुसंपादन रायगड शुन्य विभागाचे उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के पाटील यांच्याकडे सोपविण्यात आले आहेत. तसेच भुसंपादन समन्वयक पदाचा अतिरिक्त पदभार निवडणूक

पान २ वर

आगरसुरे फाट्यावर महिलेला एसटीने चिरडले

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

➤नुकसान भरपाईसाठी शेकापची मागणी

रस्ता ओलांडणाऱ्या आदिवासी महिलेचा एस टी बस खाली चिरडल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. सदर अपघात आगरसूरे फाट्यावर मंगळवारी (२७ डिसेंबर(सकाळी ८.५० च्या सुमारास घडला.रंजना किसन भस्मा ३० रा. सडावाडी, बेणसे तालुका पेण असे या अपघातात मृत्यू झालेल्या आदिवासी महिलेचे नाव आहे. दरम्यान, मृत महिलेच्या नातेवाईकांना एसटीकडून तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यासाठी शेकापक्षाच्या शिष्टमंडळाने अलिबाग आगार व्यवस्थापकांची भेट घेतली.

अलिबाग आगाराची (एम एच १४ बी टी २२७३) ही सासवणे पनवेल सकाळी ८.२० वाजता सासवणे येथून निघाली. सदर बस आगरसुरे फाटा येथे आली असता अलिबागकडे जाणाऱ्या रंजना किसन भस्मा यांनी बस चालकाला हात करीत बस थांबवण्याचा प्रयत्न करीत रस्ता ओलांडू लागल्या. मात्र बस न थांबवता चालक शैलेश केशव पाटील यांनी सुरूच ठेवल्याने बसची जोरदार धडक बसून रंजना या बसखाली सापडल्या. बसच्या चाकाखाली चिरडल्याने गंभीर जखमी झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या सोबत असलेल्या पती किसन भस्मा यांच्या समोरच त्यांचा अपघात झाला. त्यांना जिल्हा

पान २ वर

हत्येप्रकरणी दोघांना अटक

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील पोयंजे येथे ८० वर्षीय वृद्ध इसमाची हत्या केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. सचिन उर्फ शशीभाऊ वाघमारे (वय ३५) व धनराज महादू वाघमारे (वय ३३, दोन्ही रा.पोयंजे आदिवासी वाडी) अशी आरोपींची नावे आहेत.

पोयंजे येथील पांडुरंग मऱ्या मते यांच्या कपाळावर, चेहऱ्यावर व डोक्याच्या पाठीमागे वार करून त्यांना ठार मारण्यात आले होते. त्यानंतर त्यांचा मृतदेह वाहत्या पाण्यात टाकून दिला होता. आरोपींचा शोध घेण्यासाठी पनवेल तालुका पोलिसांनी विविध पथके स्थापन केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. पांडुरंग मते हे रात्रीच्या वेळेस तोंडावर बॅटरीचा प्रकाश मारायचे व सतत शिवीगाळ करायचे. तसेच मते हे शशिभाऊच्या घरी येत असत ते त्याला आवडत नव्हते त्यामुळे त्यांच्यात भांडण देखील झाले होते.

याचा राग मनात धरून लाकडी काठीने मारहाण करून पांडुरंग मते यांना ठार मारले. व त्यांचा मृतदेह वाहत्या पाण्यात टाकून ते पळून गेले. न्यायालयात दोघांना हजर केले असता त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

पान २ वर

नेरळचे रेल्वे फाटक टेम्पोने उडविले, वाहतूक विस्कळीत

। नेरळ । प्रतिनिधी ।

मध्य रेल्वेच्या मेन लाईन वरील मुंबई कर्जत मार्गावरील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकापुढील कर्जत दिशेकडे असलेले रेल्वे फाटक तेथून वाहतूक करणाऱ्या टेम्पो चालकाने तोडले. त्यानंतर त्या फाटकातून होणारी वाहनांची वाहतूक तब्बल अडीच तास बंद होती. दरम्यान, मध्य रेल्वेकडून त्या टेम्पो चालकावर गुन्हा नोंद करण्यात आला असून रेल्वे फाटकाला धडक देणारा टेम्पो रेल्वे सुरक्षा दलाच्या ताब्यात आहे.

नेरळ रेल्वे स्थानकाच्या पुढे गेट नंबर २७ हे फाटक आहे. हे फाटक नेरळ पूर्व आणि पश्चिम भाग जोडणारे महत्वाचे फाटक आहे. त्यावेळी दिवसभर या फाटकातून वाहनांची वर्दळ सुरु असते. मंगळवारी २७ डिसेंबर रोजी दुपारी एक वाजता नेरळ पूर्व भागातून नेरळ बाजार पेठ मध्ये एक टेम्पो फाटक ओलांडून जात होता. (एमएच ०५- आर ८००१) या क्रमांकाचा टेम्पो भंगाराच्या साहित्य तेथून जात होता. मात्र त्या टेम्पोवरील लोखंडी साहित्य हे रेल्वे फाटकाच्या लोखंडी खांबाला धडकले आणि त्यामुळे रेल्वे फाटक अर्धवट मोडून पडले. त्याचा परिणाम त्या ठिकाणी रेल्वे फाटक यांचे ऑपरेशन करून तेथील बी केबिन मध्ये बसणाऱ्या रेल्वे कामगाराला शक्य नव्हते. त्यामुळे त्या फाटकातून होणारी वाहतूक दुपारी एक वाजता बंद पडली.

त्यानंतर नेरळ रेल्वे स्थानकात असलेले आरपीएफ जवान यांनी फटकळ धडक देणारा टेम्पो ताब्यात घेतला. चालकावर गुन्हा दाखल केला असून या प्रकाराने नेरळ पाडा येथे फाटक क्रमांक २७ हे तब्बल अडीच तास बंद होते. दुपारी साडे तीन वाजता ते फाटक सुरु झाल्यानंतर वाहन चालक यांनी नेरळ पूर्व ते नेरळ पश्चिम अशी वाहतूक पुन्हा सुरु झाली.मात्र फाटक बंद असल्याने वाहन चालक यांना कर्जत येथे जाण्यासाठी नेरळ पूर्व भागातील वाहन चालक यांना आंबिवली येथील फाटक

पान २ वर

मोटारसायकली चोरणारी टोळी जेरबंद

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

खोपोली शहर आणि परिसरातून मोटारसायकली चोरणाऱ्या टोळीला पकडण्यात पोलिसांना यश आले आहेत. या प्रकरणी दोघाजणांना कुर्ला येथे अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या दीड लाख रुपये किंमतीच्या मोटारसायकली जप्तही करण्यात आल्या आहेत.

वरची खोपोली व काटरंग परिसरातून २२ डिसेंबर २०२२ रोजी मोटारसायकल चोरी झाल्याचे दोन वेगवेगळे गुन्हे खोपोली पोलीस ठाणे येथे दाखल झाले होते. गुन्ह्याचा

तपास करीत असताना घडलेल्या घटनेच्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तसेच शेडुंग टोलनाका येथील फुटेज दत्ता नुलके, कादर तांबोळी यांनी संकलीत करून आरोपीत याने गुन्हयामध्ये वापरलेले चारचाकी वाहनाचा नंबर प्राप्त केला व त्यावरून आरोपी व त्याचे साथीदार यांचा शोध घेण्यासाठी मुंबई परिसरात रवाना झाले. तपास पथकाला मिळालेल्या माहितीनुसार आरोपी हे कुर्ला चुनाभट्टी भागातील कुरेशीनगर येथील असल्याची माहिती मिळाली. तपास पथकाने सदर ठिकाणी जावुन चोरीस गेलेली दोन मोटार सायकल, चोरी करताना वापरण्यात आलेले फोर व्हिलर वाहन क्र.एमएच.०२. एव्ही.३३०३, तसेच तीन आरोपी यांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी याने काटरंग व वरची खोपोली परीसरातुन चोरीस गेलेल्या दोन्ही मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली आहे.

चोरीस गेलेल्या दोन्ही मोटार सायकल चुनाभट्टी कुर्ला येथून आरोपींकडून जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपी यांच्यावर यापूर्वी ३ ते ४ गुन्हे

पान २ वर

अनिल देशमुख यांच्या सुटकेचा मार्ग मोकळा

। मुंबई । प्रतिनिधी ।

१०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात तुरुंगात असलेले राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा कारागृहाबाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अनिल देशमुखांच्या जामिनाच्या स्थगितीला मुदत वाढवून देण्याची केंद्रीय अन्वेषण विभागाची (सीबीआय) मागणी उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे अनिल देशमुख यांची बुधवारी (२८ नोव्हेंबर) कारागृहातून सुटका होण्याची शक्यता आहे.

काही दिवसांपूर्वी मुंबई उच्च

आज येणार बाहेर

न्यायालयाडून अनिल देशमुखांना जामीन मंजूर करण्यात आला होता. पण, सीबीआयला या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता यावे यासाठी देशमुखांच्या सुटकेच्या आदेशाची दहा दिवस अंमलबजावणी न करण्याचे न्यायालयाने स्पष्ट केलं होतं.

दरम्यान, देशमुखांच्या सुटकेच्या आदेशाला देण्यात आलेल्या स्थगितीची मुदत आज (२७ नोव्हेंबर) संपणार होती. याप्रकरणी आज उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी पार पडली. तेव्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होईपर्यंत अनिल देशमुखांच्या जामिनावरची स्थगिती वाढवण्यात यावी, अशी मागणी सीबीआयच्या वतीने उच्च न्यायालयात करण्यात आली. मात्र, सीबीआयची ही मागणी उच्च न्यायालायने फेटाळून लावली. त्यामुळे उद्याच अनिल देशमुखांची सुटका होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

'अलिबागमधील जिल्हा रुग्णालयाची तातडीने दुरुस्ती करा'

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी।

अलिबाग येथील रायगड जिल्हा सामान्य रुग्णालयाची नादुरूस्त झाल्याने नवीन इमारत बांधण्याबाबत तातडीने कार्यवाही केली जावी, अशी आग्रही मागणी शेकापचे आ. जयंत पाटील यांनी मंगळवारी विधानपरिषदेत औचित्याचा मुद्याद्वारे सरकारकडे केली आहे.

जिल्ह्यातील सर्व सामान्य नागरिकांना हक्काचे रूग्णालय समजल्या जाणाऱ्या जिल्हा सामान्य रूग्णालयाची अवस्था एखाद्या रूग्णासारखी झाली आहे. जिल्हा सामान्य रूग्णालयातील शस्त्रक्रिया कक्षाच्या छतातून गळती सुरू आहे. त्यामुळे या ठिकाणी एकही शस्त्रक्रिया न झाल्याने गरीब व गरजू रुग्णांना खाजगी रूग्णालय किंवा मुंबई, नवी मुंबईतील रूग्णालयाचा आधार घ्यावा लागत असल्यामुळे आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. असेही त्यांनी निदर्शनास आणले. शस्त्रक्रिया विभागासह रूग्णालयाच्या आवश्यक दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने तसेच ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम करणे, या इमारतीवर आतापर्यंत १५ ते २० कोटीहून अधिक खर्च झाला असून सदर इमारत जीर्ण अवस्थेत आहे. असे ते म्हणाले.

तसेच निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर व संबंधीत अधिकाऱ्यांवर तातडीने

पान २ वर

भूमिगत वीज वाहिनीचे काम संथगतीने

रायगड जिल्ह्यातील अलिबाग नगरपरिषदेच्या राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पातंर्गत भूमिगत विद्युत प्रकल्प प्रणालीचे काम संथगतीने चालू असल्याचे आ.जयंत पाटील यांनी मंगळवारी विशेष उल्लेखाद्वारे मुद्याद्वारे सभागृहाच्या निदर्शनास आणले.

या भूमिगत वीज वाहिनी योजनेत अलिबाग नगरपरिषद जवळील मौजे चेंढरे हे गाव पूर्णतः समाविष्ट करण्यात आले आहे. भूमिगत केबल टाकण्यासाठी ट्रॅचिंग व ट्रॅच लेस जमिनीत आडवे ड्रिलिंग करून भूमिगत वाहिन्या करण्याचे असतानाही चेंढरे व वरसोली ग्रामपंचायत हद्दीमध्ये रस्ता खोदून भूमिगत विद्युत वाहिनी टाकून सदर रस्ता हा माती- दगड भराव करून बूजविण्यात आलेले आहेत. त्यामुळे चेंढरे व वरसोली या ग्रामपंचायत हद्दीतील नुकतेच नव्याने दुरूस्त करण्यात आलेले रस्ते खोदून सदर रस्ते वाहतुकीसाठी नादुरूस्त करण्याचे काम येथील ठेकेदाराने केल्याने सदर ग्रामपंचायतीसह शासनाचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक व सार्वजनिक दळणवळण मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. असे त्यांनी निदर्शनास आणले.

सबब सदर झालेल्या नुकसानीस संबंधीत ठेकेदाराला जबाबदार धरून नादुरूस्त झालेले सर्व रस्ते ठेकेदाराकडून नव्याने तयार करून घ्यावेत व भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्यासाठी ट्रेंचिंग व ट्रेंच लेस जमिनीत आडवे ड्रिलिंग या पध्दतीचा वापर करून सदर नादुरूस्त रस्त्याची दुरूस्ती करण्यात यावे असे निर्देश शासनाकडून तातडीने देण्यात यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

सदर नादुरूस्त झालेले रस्ते संबंधीत ठेकेदाराने दुरूस्त न केल्यास त्याच्यावर

पान २ वर

अंगणवाडी सेविकांचा पेणमध्ये मोर्चा

। पेण । प्रतिनिधी ।

गेली अनेक वर्षे शासनाकडे प्रलंबित असलेल्या मागण्या मान्य करण्यात याव्यात यासाठी पेणमध्ये एकात्मिक बालविकास कार्यालयावर महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या वतीने उपाध्यक्षा रश्मी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला होता.

यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या विरोधात घोषणा देत सरकारच्या वेळकढूपणा धोरण आणि कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांकडून सतत होणार दबाव या विरोधात हा मोर्चा काढून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी बोलताना महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या उपाध्यक्षा रश्मी म्हात्रे यांनी सांगितले की, गेली ५ वर्षे अंगणवाडी सेविकांना मानधनात वाढ करण्यात आली नसून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रत्येक तालुक्यात मोर्चा काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अंगणवाडी सेविकांना मानधनात वाढ करण्यात यावी, उच्च न्यायालयाचे आदेश असून सुद्धा

पान २ वर

गडचिरोलीतील मेडीगड्डा धरणग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्या

आ.जयंत पाटील यांची मागणी

। नागपूर । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र - तेलंगणा सीमेवर सिरोंचा तालुक्याला लागून तेलंगणा सरकारने बांधलेल्या मेडीगड्डा धरणामध्ये अधिग्रहित जमिनीचा योग्य मोबदला देण्यात यावा असा प्रश्न मंगळवारी विधानपरिषदेत शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. भाई जयंत पाटील यांनी उपस्थित केला. यावर झालेल्या चर्चेत मंत्री शंभूराज देसाई यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन दिले.

मागील महिनाभरापासून सिरोंचा तालुक्यातील मेडीगड्डा धरणग्रस्त शेतकरी अधिग्रहित जमिनीचा मोबदला देण्यात यावा, नव्याने सर्वेक्षण करून बाधित क्षेत्राचे देखील अधिग्रहण करून त्याचाही मोबदला देण्यात यावा आदी मागण्यांसाठी उपोषणाला बसले आहेत.

हिवाळी अधिवेशनात देखील त्यांनी साखळी उपोषण केले. मात्र, प्रशासन त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने शेकापचे आमदार भाई जयंत पाटील यांनी हा मुद्दा मंगळवारी विधानपरिषदेत लावून धरला.

काही दिवसांपूर्वी ते गडचिरोली येथे आले असता पीडित शेतकऱ्यांनी त्यांच्यासमक्ष आपली व्यथा मांडली होती. हीच व्यथा आमदार पाटील यांनी विधान परिषदेत उपस्थित करून शेतकऱ्याना न्याय देण्यात यावा अशी मागणी केली. या प्रश्नांवरील उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी यासंबंधीची प्रक्रिया सुरू असून शेतकऱ्यांचा प्रश्न लवकरच निकाली निघणार असल्याचे सांगितले.

गेल्या ४ वर्षांपासून पीडित शेतकरी आंदोलने करीत आहे. अनेक मंत्र्यांना त्यांनी निवेदने दिली. पण हा प्रश्न जैसे थे होता. परंतु आमदार भाई जयंत पाटील, शेकापचे जिल्हा चिटणीस भाई रामदास जराते यांनी मेडीगट्टा धरणग्रस्तांच्या या प्रश्नांचा पाठपुरावा केला. त्यामुळे लवकरच शेतकऱ्यांना मोबदला मिळणार आहे. शासनाने शब्द न पाळल्यास पुन्हा आक्रमकपणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई रामदास जराते यांनी दिला आहे. संमती निवाडा करून भुधारकास वाजवी व न्याय मोबदला देण्याची तजवीज ठेवण्यात येत आहे असेही महसूल मंत्र्यांनी आपल्या उत्तरात सांगितले.

चौसाळा येथील मांजरा नदीवर पूल उभारा

चौसाळा (जि. बीड) येथील पाच कि.मी. अंतरावर असलेल्या मांजरा नदीवर तातडीने पूल उभारला जावा, अशी मागणी आ.जयंत पाटील यांनी ग्रामविकास मंत्र्यांकडे केली आहे.

नदीवर पूल नसल्यामुळे मुंडे वस्ती आणि आंधळे वस्तीतील लहान मुलांना, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, रूग्णांना तसेच दैनंदिन कामकाजासाठी ग्रामस्थांना हिंगणी खुर्दमध्ये ये-जा करण्यासाठी बाराही महिने नदीच्या पाण्यातून प्रवास करावा लागतो, शिवाय दरवर्षी पावसाळ्यात मुंडे वस्ती व आंधळे वस्ती येथे राहणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना हिंगणी व चौसाळा येथे तसेच शेतकऱ्यांना शेतात तीन ते चार महिने जाता येत नाही, असेही निदर्शनास आणले. शासनाने मुंडे वस्ती व आंधळे वस्ती येथील विद्यार्थ्यांना तसेच ग्रामस्थांना सोयीस्कर प्रवास करण्यासाठी मांजरा नदीवर पूल बांधण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, अशी विचारणा करण्यात आली. या प्रश्नावर ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी सदर ठिकाणी मांजरा नदीवर नवीन पूल बांधणे आवश्यक असून सदर पूलाचे काम नवीन पूल बांधकामाच्या योजनांमध्ये (उदा, नाबार्ड, जिल्हा वार्षिक योजना, इ.) प्रस्तावित करण्याबाबतच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. अशी माहिती दिली आहे.

'जगदीश गायकवाडांच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करा'

। नागपूर । दिलीप जाधव ।

पनवेल महानगरपालिकेचे माजी उपमहापौर जगदीश गायकवाड आणि त्यांच्या नातेवाईकांनी सिडकोच्या ५ एकर भूखंडावर केलेले अतिक्रमण किती दिवसात काढणार असा संतप्त सवाल आ.जयंत पाटील यांनी मंगळवारी विधान परिषदेत उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले की या अनधिकृत बांधकामाबाबत मी चौथ्यांदा सभागृहाचे लक्ष वेधत आहे. माजी उपमहापौरांनी आपल्या पदाचा गैरवापर करून तसेच अधिकाऱ्यांवर दड़पशाही करून पनवेल येथील मौजे रोडपाली येथील बौद्धवाड़ी सेक्टर -१८ कळबोली येथील सिड़कोच्या अखत्यारितील असलेल्या ५ एकर भूखंडावर अनधिकृतपने व्यवसायिक चाळ, बहुमजली इमारत व मोठे पार्किंग, मोबाईल टॉवर उभारण्यात आले आहेत.

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागामार्फत या बांधकामाची पाहणी करून सिड़को कायद्याअंतर्गत नोटिस बजावण्यात आली आहे. मात्र हे अतिक्रमण अद्याप निष्काषित केले नाही .ते सिड़को कधी करणार असा संतप्त सवाल जयंत पाटिल यांनी केला.

यावर सरकारतर्फे मंत्री शंभूराजे देसाई म्हणाले की सदरचे अनधिकृत बांधकाम पाडण्याकरण्या करीता १६ डिसेंबर २०२२ रोजी जागेची पाहणी करण्यात आली आहे. त्या जागेवर २१ अनधिकृत बांधकामे नक्की करण्यात आली आहे.

३० डिसेंबर २०२२ रोजी हे अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी कळबोली पोलिस ठाणे यांना पोलीस बंदोबस्तासाठी कळविण्यात आले आहे. या कारवाईत पनवेल महानगरपालिका सहभागी होणार आहे. तसेच राज्य शासनाच्या गृह विभागाला कळविण्यात आले आहे, असे सुचित केले.

महामार्गांसाठी भूसंपादनाचे दर समान आवश्यक

। नागपूर। प्रतिनिधी।

राज्यातील महामार्गा करीता अधिगृहित केल्या जाणार्या जमीनीच्या भरपाईपोटी एका तालुक्यात वेगवेगळे दर का? ही शेतकऱ्यांची फसवणूक आह, यात बदल करणार का ?असा सवाल आ. जयंत पाटील यांनी विधान परिषदेत उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले की, नवीन महामार्गामध्ये जाणाऱ्या त्या त्या भागातील बहुतांश जमिनी या चांगल्या प्रतीच्या पिकाऊ, सिंचित झालेल्या आणि बारमाही पीक देणाऱ्या असल्यामुळे शेतकर्यांचे आर्थिक नुकसान होते. नैना, नवीमुंबई विमानतळ, समृद्धी महामार्गाकरीता केले जाणारे भूसंपादनाचे दर तेथील अधिकारी ठरवतात. स्थानिक आमदारांनाही विचारत नाहीत. प्रकल्पात जमिनी गेल्यावर समाधानकारक मोबदला मिळाला नाही तर न्यायालयात दाद मागून मोबदल्याची रक्कम वाढून मिळते हे लक्षात आल्यावर आता लोक न्यायालयात धाव घेतात असे पाटील यांनी सांगितले.

एकनाथ खडसे म्हणाले की, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी केलेल्या सुचनेनंतर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कमी प्रमाणात दिला जात आहे. या करीता सरकारने कायदा लागू करावा नाहीतर प्रकल्प ग्रस्त शेतकरी उद्वस्त होईल. नवीन कायदा समृद्धी महामार्गाला का लावला नाही. तिथे तर भरमसाठ भाव देऊन जमीनी खरेदी करण्यात आल्या आहेत. कारण तो उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. कितीही भ्रष्टाचार झाला तरी जमिनी घ्या, हे धोरण या सरकारचे आहे, असा आरोप एकनाथ खडसे यांनी यावेळी केला .

यावर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील उत्तर देताना म्हणाले की, राष्ट्रीय महामार्गाकरीता, ग्रीन फिल्ड प्रोजेक्टसाठी केलेल्या भुसंपादनाचा मोबदला यात फरक राहणारच आहे. एकसारखे दर शक्य नाही. मात्र यात सुधारणा केली जाईल. नैनासाठी सिडको प्राधिकरण हे जमिनीचा मोबदला रेडीरेकनर प्रमाणे अदा करत. प्रकल्पासाठी केलेल्या भूसंपादनाचा मोबदल्याची रक्कम वाढल्यामुळे प्रकल्पाची किंमत भरमसाठ वाढते. त्यामुळे रेडीरेकनरने शेतकर्यांना नुकसान मोबदला दिला जातो. मात्र यात बदल करण्याचा अधिकार हा राज्य सरकारला आहे हा निर्णय प्रकल्पाला चालना देण्या साठी आघाडी सरकारच्या काळात घेण्यात आला आहे. असे महसूल मंत्र्यांनी सांगितले.

'खनिज, रेती उत्खनन रोखण्यासाठी सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेरे बसवा'

अनधिकृत खनिज उत्खनन आणि वाळूचा उपसा रोखण्यासाठी सीसीटिव्ही आणि ड्रोन कॅमेरे तातडीने लावले जावेत, अशी मागणी शेकापचे आ. जयंत पाटील यांनी लेखी प्रश्नाद्वारे सरकारकडे केली आहे. हे गोरख धंदे थांबविण्यासाठी दि.१५ जानेवारीपर्यंत आवश्यक त्या ठिकाणी सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेरे कार्यान्वित केले जातील, असे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उत्तरात नमूद केले आहे.

विधानपरिषदेत उपस्थित झालेल्या या प्रश्नावर आ.जयंत पाटील यांनी असे म्हटले आहे की, महसूल खात्यांतर्गत परवानगी दिल्यानुसार खनिज उत्खनन अथवा वाळूचा उपसा केला जातो. प्रत्यक्षात त्याची रॉयल्टी १० टक्केही भरली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. याकरीता सीसीटीव्ही कॅमेरे, ड्रोन किती दिवसात लावणार तसेच लावलेली यंत्रणा सुस्थितित आहे की नाही, हे पाहण्यासाठी लागणार्या यंत्रणेला किती खर्च येणार आहे. असा सवाल जयंत पाटिल यांनी विधान परिषदेत महसूल मंत्र्यांना केला. यावर उत्तर देताना अनधिकृत वाळूचा उपसा, अनधिकृत खनिज उत्खनन सारखा गोरखधंदा रोखण्यासाठी नवीन वर्षात १५ जानेवारी पर्यन्त याची कार्यवाही केली जाईल असे महसूल मंत्री विखे-पाटील यांनी सांगितले.

जेट्टी बांधून रस्त्यांची दुरुस्ती करा

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मच्छीमारांसाठी जेट्टी बांधणे व प्रवासी जेट्टीकडे जाणाऱ्या पुलाची दुरूस्ती केली जावी, अशी मागणी आ.जयंत पाटील यांनी विशेष उल्लेखाद्वारे केली आहे.

मुंबई ते उरण रस्ते मार्गाने प्रवास करण्यासाठी २ तासापेक्षा जास्त वेळ लागतो. जलमार्गाने हाच प्रवास अवघ्या ४० मिनीटात होतो. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील उरण येथील नागरिक जलमार्गाने प्रवासाला अधीक प्राधान्य देत आहेत. मोरा जेट्टीहून सुमारे १२०० ते १५०० प्रवाशी रोज प्रवास करीत आहेत. मोरा जेट्टी ते भाऊचा धक्का दरम्यान फेरी बोटीच्या एकूण ३४ फेऱ्या दररोज होत असतात. मात्र सध्या मोरा जेट्टीकडे जाणाऱ्या पुलाची दुरावस्था झाल्याने मोरा ते भाऊचा धक्का प्रवास धोकादायक झाला आहे. तरी मोरा जेट्टी येथील जीर्ण आवस्थेत असलेल्या पुलाची तातडीने दुरूस्ती करण्यात यावी. अशी मागणी त्यांनी केली.

भागवाडी गावाची नोंद महसूल दप्तरी करा

अलिबाग तालुक्यातील सुडकोली ग्रामपंचायत हद्दीतील भागवाडी गाव हे तळवली तर्फे उमटे मध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे शासनाच्या महसूल दप्तरी तळवली तर्फे उमटे अशी नोंद असल्यामुळे भागवाडी गाव हे अनेक वर्षांपासून शासनाच्या योजनांपासून तसेच विकास कामे आणि सोयी-सुविधांपासून वंचित राहिलेला आहे. त्याचप्रमाणे भागवाडी गावाच्या लोकसंख्येतही वाढ होत आहे. त्यामुळे भागवाडी या गावाला स्वतंत्र महसूल दर्जा देणे गरजेचे आहे.

सबब भागवाडी गावाच्या विकासाच्या व सोयी-सुविधांच्या दृष्टीने तसेच शासनाच्या योजनांचा ग्रामस्थांना योग्य लाभ मिळण्यासाठी भागवाडी गावाला महसूली दर्जा देवून भागवाडी गावाची नोंद शासन दप्तरी स्वतंत्र महसूल गाव म्हणून जाहिर करून मान्यता देण्यात यावी. यासाठी मी शासनाचे या महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधून विशेष उल्लेखाद्वारे मागणी केली आहे.

खरसई धरणग्रस्तांना भरपाई द्या

खरसई धरणासाठी ज्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत.त्या धरणग्रस्तांना सरकारने नुकसान भरपाई सानुग्रह अनुदान सन २०२२-२३ च्या बाजार भावाप्रामाणे देण्यात यावे, अशी मागणी शेकाप आम.जयंत पाटील यांनी औचित्याचा मुद्याद्वारे सरकारकडे केली.

जलसंपदा विभागाच्या लघुपाटबंधारे खात्याने मौजे खरसई येथील धरणाच्या प्रकल्पास मंजूरी देण्यात आल्याने येथील शेतकऱ्याचा फळबागायती, भातशेती व इतर पिके घेत असलेल्या ४० हून अधिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली होती. सन १९८४-८५ मध्ये लघु पाटबंधारे व कृषी विभागाने संयुक्तरित्या पंचनामे केले परंतु पंचनामे रद्द ठरवून सन १९९१-९२ मध्ये कृषी, महसूल व वने, जलसंपदा या विभागाने संयुक्तरित्या पंचनामे करून शेतकऱ्यांना भूसंपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला तसेच नुकसान झालेल्या फळबागांचे, शेतीचे झालेल्या नुकसानाबाबतचे सानुग्रह अनुदान अद्याप देण्यात आलेले नाही.असे त्यांनी निदर्शनास आणले. सबब या शेतकऱ्यांना तात्काळ संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला व फळबागांचे, शेतींचे झालेल्या नुकसान भरपाई सानुग्रह अनुदान सन २०२२-२३ च्या बाजार भावाप्रामाणे देण्यात यावे, अशी जोरदार मागणी जयंत पाटील यांनी यावेळी केली.

मनपा पार्किंग बांधकाम ठेकेदाराकडून ३४ लाखांची वीजचोरी

। कल्याण । वार्ताहर ।

कल्याण पश्चिमेत मनपाच्या पार्कींगचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराने तब्बल ३४ लाख १६ हजार ९६० रुपयांची वीजचोरी केल्याचे महावितरणच्या पथकाने नुकतेच उघडकीस आणले. याप्रकरणी एनसीसीसीएल-किंजल-केटीआयएल कन्सॉर्टियम कंपनी व पर्यवेक्षक फौज सिंग यांच्याविरुद्ध महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कल्याण पश्चिमेतील कोर्ट परिसरासमोर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या पार्कींगचे बांधकाम सदर कंपनीकडून सुरू आहे. शिवाजी चौक शाखेचे सहायक अभियंता मोहम्मद शेख, दक्षता व अंमलबजावणी विभागाचे रामचंद्र मासाळे यांच्या पथकाने १९ डिसेंबरला या बांधकामाच्या वीजपुरवठ्याची तपासणी केली. या तपासणीत बांधकामाच्या कामासाठी फिडर पीलरमधून थेट वीजवापर सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अधिक तपासणीत सदर कंपनीने जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत विनामीटर ८४ हजार ३७२ युनिट वीज चोरून वापरल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार ३४ लाख १६ हजार ९६० रुपयांचे चोरीच्या विजेचे देयक भरण्याची नोटीस कंपनीला बजावण्यात आली. परंतू विहीत मुदतीत या रकमेचा भरणा न झाल्याने सहायक अभियंता मोहम्मद शेख यांनी फिर्यादी दिली. त्यानुसार महात्मा फुले चौक पोलिसांनी सदर कंपनी व पर्यवेक्षक सिंग यांच्याविरुद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरिक्षक सागर चव्हाण या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

महाविकास आघाडीत वंचितही येणार

मुंबई : वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडीत सामील होण्याबाबत हालचालींना पुन्हा एकदा वेग आला आहे. या संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि वंचित बहुजन आघाडीच्या नेत्यांची विशेष बैठक सोमवारी शिवसेना भवन येथे पार पडली. या बैठकीनंतर वंचित बहुजन आघाडी लवकरच महाविकास आघाडीमध्ये येईल, असा विश्वास शिवसेना नेते सुभाष देसाई यांनी व्यक्त केला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडी युतीसंदर्भातील चर्चेची फेरी शिवसेना भवन येथे सोमवारी पार पडली. या वेळी देसाई आणि वंचित बहुजन आघाडीचे मुंबई प्रदेश अध्यक्ष अबुल हसन खान यांच्यात सविस्तर चर्चा झाली. युती संदर्भातील चर्चेची अंतिम फेरी पार पडल्यानंतर लवकरच दोन्ही पक्षांचे प्रमुख एकत्र येऊन युतीची अधिकृत घोषणा करतील, असे खान यांनी या वेळी नमूद केले.

पान १ वरुन

सीमवासियांना ठाम पाठिंबा

सर्वोच्च न्यायालयात पाठपुरावा करण्यात येईल. सनदशीर मार्गानं लढा देण्यात येईल. ८६५ गावातील मराठी भाषिक जनतेसोबत मराराष्ट्र सर्व ताकदीनिशी उभे राहील, अशा आशयाचा ठराव एकमतानं मंजूर झाला.

महाराष्ट्र विधानसभा नियम ११० नुसार कर्नाटकातील मराठी भाषिक (बेळगाव, कारवार, बिदर, बालकी, निपाणी) ८६५ गावातील इंच इंच जागा महाराष्टात समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. गेल्या अनेक दिवसांपासून कर्नाटक सीमा प्रश्नामुळे वाद पेटला आहे. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी आक्रमक भूमिका घेतली असताना शिंदे-फडणवीस बोटचेपी भूमिका घेत असल्याचा हल्लाबोल विरोधकांनी केला. अखेर आज विधिमंडळात या प्रश्नावर ठराव मांडण्यात आला. तो एकमतानं मंजूर झाला.

ठरावाची जाणीव

आरोग्य आदि सुविधा मिळाल्या पाहिजेत , तसेच त्यांच्यावर पोलीसांच्या मदतीने खोटे गुन्हे दाखल करत आहेत . तसेच कर्नाटक संघटनांकडून महाराष्ट्रातील वाहनांवर दगडफेक करून दहशतीचे वातावरण निर्माण करत आहेत . त्यावर इट का जबाब पत्थर से द्यायला पाहिजे . राज्य सरकारने सीमा प्रश्ना बाबत राज्य सरकार ने समन्वय साठी दोन मंत्र्यांची नियुक्ति केली आहे . मात्र कर्नाटकचे मुख्यमंत्री दिल्हीत ज्या पद्धतिने सर्वांच्या गाठीभेठी घेतात त्याच पद्धतीने आपल्या मुख्यमंत्र्यांनी घेतल्या पाहिजेत .ते अंबादास दानवे यांनी आपले मत मांडले .

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या भाषणात मराठी भाषिक नागरिकांसह कोणत्याही परिस्थितित महाराष्ट्रात समाविष्ठ करण्यासाठी आवश्यक तो सर्व कायदेशीर पाठपुरावा सर्वोच्च न्यायालयात करण्यात येईल.याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकड़े झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा आग्रह कर्नाटक शासनाकड़े धरणार असून सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षिततेची हमी घेण्याबाबत कळविणार आहे,असे जाहीर केले.

नेरळचे रेल्वे फाटक टेम्पोने उडविले,

२८ आणि दामत येथील फाटक २६ येथून प्रवास करावा लागला. मात्र त्यासाठी चार ते पाच किलोमीटर अंतर अधिक प्रवास करावा लागला.त्यामुळे इंधनाची बचत होऊ शकली नाही याकडे सरकारने लक्ष द्यावे अशी सूचना वाहनचालक करीत आहेत. तर या प्रकरणात फाटक तोडणाऱ्या टेम्पो सध्या रेल्वे सुरक्षा दलाच्या ताब्यात आहे

मोटारसायकली चोरणारी टोळी जेरबंद

दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक .शिरीष पवार यांचे मार्गदर्शनाखाली, गायकवाड, हंबीर, हे तपास करीत आहेत. तर सहा.पोलीस निरीक्षक राकेश कदम, तपास पथकाचे प्रसाद पाटील, दत्ता नुलके, कादर तांबोळी यांचे प्रयत्नातुन सदरचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

अंगणवाडी सेविकांचा पेणमध्ये मोर्चा

पोषण आहाराचे ॲप मराठीत करण्यात आले नसून ते ॲप मराठीत उपलब्ध करून मिळावे, अंगणवाडी सेविकांना शासकीय दर्जा मिळावा, पेन्शन सुरु व्हावी. या प्रमुख मागण्या घेऊन आज हा मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी संघटनेच्या उपाध्यक्षा रश्मी म्हात्रे, संघटक दिनकर म्हात्रे, बिटप्रमूख शर्मिला म्हात्रे, ज्योती डंगर, चंद्रकांता पाटील, आशा म्हात्रे, सुनंदा पाटील आदींसह अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी प्रकल्प प्रमुख चेतन गायकवाड यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

भूमिगत वीज वाहिनीचे काम

दंडात्मक कार्यवाही करून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याने फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे यासाठी शासनाचे या महत्वाच्या व गंभीर बाबीकडे लक्ष वेधून विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत असल्याचे सांगितले.

जिल्हा रुग्णालयाची दुरुस्ती करा'

कारवाई करण्याची आवश्यकता असणे, तसेच या ठिकाणी कोणतीही मोठी दुर्घटना होवू नये यासाठी राज्य शासनाने नवीन इमारत बांधण्याची आवश्यकता आहे, असे जयंत पाटील यांनी सांगितले.

अंगणवाडी सेविकांचा पेणमध्ये मोर्चा

पोषण आहाराचे ॲप मराठीत करण्यात आले नसून ते ॲप मराठीत उपलब्ध करून मिळावे, अंगणवाडी सेविकांना शासकीय दर्जा मिळावा, पेन्शन सुरु व्हावी. या प्रमुख मागण्या घेऊन आज हा मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी संघटनेच्या उपाध्यक्षा रश्मी म्हात्रे, संघटक दिनकर म्हात्रे, बिटप्रमूख शर्मिला म्हात्रे, ज्योती डंगर, चंद्रकांता पाटील, आशा म्हात्रे, सुनंदा पाटील आदींसह अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी प्रकल्प प्रमुख चेतन गायकवाड यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

महिलेला एसटीने चिरडले

रुग्णालयात आणले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. सदर अपघात होताच बस चालक शैलेश पाटील हा मांडवा सागरी पोलीस ठाण्यात स्वतः हजर झाला. याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, सदर महिला ही रस्ता ओलांडत असताना सदर अपघात झाला असल्याचे आगार व्यवस्थापक वनारसे यांनी सांगितले.

सदर अपघाताचे वृत्त कळताच, शेकापक्षाचे तालुका चिटणीस अनिल पाटील, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे यांच्यासह किसन काष्टे, केशव वारगुडे, धर्मेश गडखळ, जी जी मेंगाळ, जानु शिद आदींनी अलिबाग एसटी आगारात धडक देत आगार व्यवस्थापक अजय वनारसे यांनी भेट घेतली. यावेळी त्यांनी मृत महिलेच्या नातेवाईकांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची तसेच एसटी चालक याच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली. त्यावर आगार व्यवस्थापक अजय वनारसे यांनी एसटी कडून तातडीची मदत देण्यात येणार असून नुकसान भरपाईसाठी देखील आपण प्रयत्न करणार असल्याचे आश्वासीत केले.

२५३ रिक्तपदे

उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाले यांच्याकडे देण्यात आलेला आहे. तत्कालिन अलिबाग तहसिलदार मिनल दळवी यांना लाच घेताना पकडल्यानंतर अलिबागचे तहसिलदार पद देखील दीड महिन्यांहून अधिक काळ रिक्त आहे. या पदाचा अतिरिक्त कार्यभार तहसिलदार (सर्वसाधारण) विशाल दौंडकर यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. अलिबाग तालुक्यासाठी हे महत्वपुर्ण पद असल्याने नागरिकांचे अनेक प्रश्न, समस्या रखडलेले आहेत. त्यामुळे हे पद तातडीने भरण्यात येण्याची आवश्यकता आहे. तसचे ७४ नायब तहसिलदार पदे मंजुर असलेल्या पैकी ६१ पदेच भरण्यात आलेली आहेत. उर्वरित १३ पदे रिक्तच आहेत. त्यामुळे अनेक पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे आहे. लघुलेखक उच्चश्रेणीचे मंजुर असलेले एकमेव पद देखील रिक्त आहे. लघुलेखक निम्नश्रेणीच्या १० मंजुर पदांपैकी तीनच पदे भरलेली असून सात पदे रिक्त आहेत. अव्वल कारकुनांची २०५ पैकी २०० पदे भरली आहेत तर पाच पदे रिक्त आहेत. मंडळ अधिकारी ६८ मंजुर पैकी ६५ पदे भरली आहेत तर तीन पदे रिक्त आहेत. लिपीकांची सर्वाधिक १०८ पदे रिक्त आहेत. ३२५ जागांपैकी २१७ पदे भरली आहेत. तर तलाठी पदांची देखील मोठया प्रमाणावर रिक्त पदे आहेत. त्यामुळे अनेक तलाठयाकडे अतिरिक्त पदभार आहेत. त्याचा परिणाम कामांवर होत असून जनतेची अनेक कामे प्रलंबित आहेत. ३७० मंजुर असलेली तलाठयांच्या पदांपैकी २८९ पदे मंजुर असून तब्बल ८१ पदे रिक्त आहेत. तसेच वाहन चालकांच्या २८ मंजुर पैकी १८ पदे भरण्यात आली असू १० पदे रिक्त आहेत. तर शिपाई/स्वच्छक/रखवालदारांच्या १८० मंजुर पदांपैकी १५९ पदे भरलेली आहेत तर २१ पदे रिक्त आहेत.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ५७० एकूण क्षेत्र १०३८.९० चौ.मी. त्यापैकी रोड वाईडिंग करीता देण्यात आलेले क्षेत्र ४४३.२८ चौ.मी. हे क्षेत्र कर्जत नगरपरिषद यांना रोड वाईडिंग करीता हस्तांतरीत करण्याचे ठरविलेले आहे. सदर हस्तांतरीत करावयाच्या क्षेत्राच्या मोबदल्यामध्ये या मिळकतींचे मालक १) दिनेश सदाशिव मुसळे, २) अमेय दिनेश मुसळे यांना प्राप्त होणारे हस्तांतरणीय विकासाचे हक्क व अधिकार (टी.डी. आर) आमचे पक्षकारांना त्यांनी मोबदल्यास्तव प्रदान करण्याचे मान्य व कबूल करुन त्याबाबत जरुरीचे दस्त करणेचे योजिले आहे.

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी तशी लेखी व कागदोपत्री पुराव्यासह हरकत प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न केल्यास सदर व्यवहारास कोणाचीही हरकत नाही असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक २८/१२/२०२२

अधिवक्ता
स्वप्निल बाबूराव देशमुख
ऑफिस पत्ता, शॉप नं. २४, मार्वल क्षिप्रा
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड
९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. रेहान सैफुल्ला खान यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमूद मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे-पोही, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
श्री. मनोज मंगल मसणे व श्री. महेश मंगल मसणे	२२	७	0-०९-00	0-१०

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क व अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कळंब
दि : २७/१२/२०२२

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
सही/-
साकीब अशरफ पानसरे
पत्ता मु. पो. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७७७०५२५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र आर.चौ.मी.	आकार रु.पै.
काळू गणपत कोमस्कर नानाभाऊ रंगनाथ काशीद रमेश लक्ष्मण ठाकूर	१७५	३३	५-८६-१३	५८-६०

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरुपाच

आत्मदहनाच्या इशाऱ्याने खारलॅन्ड ताळ्यावर

गडब- खारमाचेचा नैसर्गिक नाला खुला

। गडब । वार्ताहर ।

गडब- खारमाचेला येथील शेतकऱ्यांनी पुकारलेल्या आत्मदहनाच्या इशाऱ्यामुळे खारलॅन्ड प्रशासनाने नमले असून त्यांनी तात्काळ सदर नैसर्गिक उघाडीचा नाला यंत्रसामग्रीच्या माध्यमातून खुला करून घेतला आहे.

पेण तालुक्यातील खारमाचेला येथील असणारी उघाडी (नैसर्गिक नाला) काही महिन्यांपूर्वी येथील जेएसडब्ल्यु कंपनीने पाईप टाकून बंद केला. त्यामुळे येथील शेतकऱ्यांवर अन्याय होऊन मच्छीमारी करता येत नव्हती.

शेतजमीन नापीक होऊन येथील शेतकऱ्यांवर व मच्छीमारांवर सुद्धा उपासमारीची वेळ आल्याने अखेर बापदेव शेतकरी मंडळ खारमाचेला

यांच्या माध्यमातून २६ डिसेंबरला शेतकरी व मच्छीमार प्रांत कार्यालय येथे आत्मदहन करणार असल्याचे निवेदन प्रशासनाला दिले होते. त्यानुसार आज सकाळपासूनच पोलीस प्रशासनाने प्रांत कार्यालयाला बाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात ठेवला होता. मात्र शेतकऱ्यांवर अन्याय होऊ याकरीता जिल्हा परिषद माजी सभापती संजय जांभळे, सामाजिक कार्यकर्ते राजु पाटील, समिधा पाटील यांनी खारलॅन्डच्या अधिकाऱ्यासमोर ठाण मांडून ही समस्या तातडीने सोडवा अशी मागणी केली असता खारलॅन्ड अधिकारी सुरेश सावंत यांनी लागलीच यंत्रसामुग्रीसह त्याठिकाणी जाऊन जेसीबीच्या सहाय्याने सदर बंदिस्त असणारी उघाडी मोकळी केली. उर्वरित काम येत्या पंधरा दिवसांत पूर्ण करणार असल्याचे यावेळी सावंत यांनी सांगितले.

> येथील बांधाना खांडी जाऊन शेतकऱ्याच्या शेतात खारे पाणी जात होते. यामुळे खारभूमी विभागाने आमच्याकडे सदर बांधबदिस्तीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव पाठवला होता. त्यानुसार सीएसआर फंडातून हे काम केले आहे. खारभुमी विभागाचे सहकार्याने बांध बांधले आहेत त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी वाचल्या आहेत.
> – नारायण बोलबंडा,
> – अधिकारी जेएसडब्ल्यु

> खारमाचेला येथील उघाडी (नैसर्गिक नाला) जेएसडब्ल्यु कंपनीने पाईप टाकून बंद केला होता.त्यामुळे आमच्या शेतीवर तसेच मच्छीमारी व्यवसायावर परिणाम होत असल्याने याकरिता आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता मात्र खारलॅन्ड प्रशासनाने तातडीने सदर नाला खुला केला असून उर्वरित काम येत्या १५ दिवसात करण्यात येणार असल्याचे पत्र संबंधित अधिकारी यांनी दिल्यामुळे सदर आत्मदहन आंदोलन स्थगित करण्यात आला आहे.
> – सुनील कोठेकर,
> अध्यक्ष, बापदेव शेतकरी मंडळ खारमाचेला

■ पनवेलमधील पेशवेकालीन वडाळे तलावात पुन्हा एकदा कमळे फुलली आहेत. हे दृष्य पाहून सारेजण आनंदित होत आहेत. (छाया – राजेश डांगळे)

म ह त्त्वा चे

भिसेगांवमध्ये गाईचा वाढदिवस

। नेरळ । प्रतिनिधी ।

भिसेगांव येथील मयुरेश चौधरी यांच्या घरातील गायीचा दहावा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. मयुरेश या प्राणी मित्राला जनावरे पाळण्याची मोठी हौस. त्यामुळे त्यांच्या घरी ज्यावेळी गायीचे आगमन झाल तेव्हा तिचे नाव गौरी ठेवले. सहसा जनावरे गोठ्यात असतात, मात्र गौरी गाय ही चौधरी कुटुंबाच्या सर्वांच्या समोर असते. गेली दहा वर्षे ते नियमितपणे या गायीचा वाढदिवस उत्साहात साजरा करतात. यावर्षी गौरी गायीचा दहावा वाढदिवस असल्याने भिसेगाव मधील चौधरी कुटुंबांच्या दारासमोर भला मोठा मांडव उभारला होता. या सोहळ्यानिमित्त भजन, संध्या तसेच गोवर्धन क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केलेल्या व्यक्तींचा सत्कार असे कार्यक्रम आयोजित केले होते.

अवैध वाहतूकदारावर कारवाईचा बडगा

। पनवेल । वार्ताहर ।

आरटीओ विभागाने वायुवेग पथकाद्वारे अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करणाऱ्यास सुरुवात केली असून त्यांच्याकडून २ लाख ७८ हजारांचा दंड वसूल केला. कळंबोली मॅकडोनाल्ड, खालापूर टोल नाका तसेच जुना मुंबई-पुणे महामार्गावर विशेष तपासणी मोहिम राबवण्यात आली. तपासणी दरम्यान प्रवाशांच्या वैयक्तिक सामानाव्यतिरिक्त बसमधील व्यापारी मालाची अवैध वाहतूक करणाऱ्या २१ प्रवासी बसेसवर कारवाई करण्यात आली. यामध्ये त्यांच्या कडून २ लाख ७८ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात असून यापुढे सुद्धा सदर कारवाई पुढे सुरु राहणार असल्याचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे देण्यात आली आहे.

सार्वजनिक मुतारीसाठी ग्रामस्थ आक्रमक

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील आसरे बौद्धवाडी येथील मुतारी एका फार्महाऊस मालकाने हटवली आहे. त्यामुळे हटवलेली मुतारी पुन्हा बांधून देऊन संबंधित इसमावर कारवाई करावी अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली असून या संबंधीचे निवेदन पाली-सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार यांना दिले. व कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला.

निवेदन देतेवेळी अशोक जाधव, हिरामण जाधव, रमेश जाधव, स्वप्निल जाधव, रोहित जाधव, वैभव जाधव, राकेश जाधव, कल्पेश जाधव, गौरू जाधव, वंचित बहुजन आघाडी रायगड जिल्हा युवा अध्यक्ष अमित गायकवाड, राज जाधव, स्वप्निल जाधव व मोहन जाधव आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

सुषमा अंधारे यांच्या विरोधात आंदोलन

। दांडगुरी । वार्ताहर ।

शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांच्याविरोधात श्रीवर्धन शहरात मंगळवारी मोर्चा काढण्यात आला. तालुक्यातील दिघी, आदगाव, भरडखोल, जीवना कोळीवाडा, मुळगाव कोळीवाडा या ठिकाणचा वारकरी संप्रदाय, त्याचप्रमाणे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, भारतीय जनता पार्टी व बाळासाहेबांची शिवसेना या सर्व पक्षांच्या व संघटनांच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात संतोष चौकर ,रामचंद्र बुवा वाघे,देवेंद्र भुसाणे, प्रशांत शिंदे, पिंट्या वेश्विकर, सावन तवसाळकर,शैलेश खापणकर, मनोज गोगटे यासह अनेक कार्यकर्ते व महिला कार्यकर्त्या व तमामन हिंदु बांधव उपस्थित होते.

नैना प्रकल्पाला सुकापूरवासियांचा विरोध

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

सुकापुर येथे नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समिती आणि सुकापुर सोसायटी सदस्य आणि ग्रामस्थांची बैठक संपन्न झाली. या नैनाविरोधी बैठकीला सोसायटी सदस्य आणि ग्रामस्थांचा भरघोस प्रतिसाद लाभला. आम्हाला एफ.एस.आय वाढवून द्या जेणेकरून आमचा पुनर्विकासाचा प्रश्न सुटेल. आम्ही ६० टक्के जागा देणार नाही ही भूमिका घेऊन येथे सर्व उतरलेले होते. या बैठकीसाठी मोठ्या संख्येने सोसायटी सदस्य ग्रामस्थ आणि नागरिक उपस्थित होते.

या बैठकीमध्ये प्रोजेक्टरद्वारे आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांनी नैना प्राधिकरण महानगरपालिका एम.एम. आर.डीए, एम.एस.आर.डीसी, जुनं सिडको क्षेत्र यामधील तुलनात्मक गोष्टी लोकांसमोर ठेवल्या. आणि नैना किती घातक आहे हे सर्व नागरिकांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला. मुळात आमची जागा मोफत ६० टक्के आम्ही द्यायचीच का? याच प्रश्नावरती ग्रामस्थांनी आणि सोसायटीचे सदस्य यांच्यामध्ये चर्चा रंगली, नैना शेतकऱ्यांसाठी घातक असल्याने लोकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झालेला आहे. या ठिकाणी नैनाने कोणत्याही भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास न करता हे प्राधिकरण आपल्यावरती लादण्याचा प्रयत्न केलेला आहे असं स्पष्ट मत राजेश केणी यांनी व्यक्त केलं.

आम्हाला आमच्या सोसायट्यांचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने २ चा एफ एस आय मिळावा आणि आमच्या मोडकळीस आलेल्या बिल्डिंग पुनर्विकासासाठी जाव्यात अशा पद्धतीची इच्छा सर्व नागरिकांनी बोलून दाखवली. बिल्डिंगला साधारणतः ३०- ३२ वर्षे झाली आहेत. आम्ही स्वतःची कष्टाची मेहनतीची कमाई लावून या ठिकाणी घरे घेतली, लोनचे हप्ते फेडता फेडता आमचा जीव मेटाकुटीला येत होता. आज लोनचा कालावधी संपायची वेळ आणि बिल्डिंग तुटायची वेळ ही एकच झालेली आहे. त्यामुळे शासनाने आमची खरी परिस्थिती जाणून यावरती न्याय द्यावा अशा पद्धतीची भूमिका राजेश केणी यांनी मांडली. शेखर शेळके यांनी हा लढा २०१३ पासून सुरू असल्याचे सांगताना समाजातील कोणत्याच घटकाचा यामध्ये फायदा होत नसल्याचे सांगून फायदा जो होतो तो फक्त नैना प्रशासनाचा होतो. या बैठकीमध्ये सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी सुद्धा आपलं मत व्यक्त केलं.

सुरेश ठाकूर यांनी सुद्धा मार्गदर्शन करताना आंदोलनासाठी सज्ज राहण्याचं आवाहन केलं. दत्ता भगत, राजेश केणी, नामदेव फडके, शेखर शेळके, सुभाष भोपी, बाळाराम फडके, गजानन पाटील, बबन फडके, जगदीश वाघमारे, एड रामचंद्र वाघमारे, किसन भुजंग, किशोर पाटील, अनिल उलवेकर, प्रभाकर केणी, संदीप म्हसकर, संजय फडके, सुदाम वाघमारे, अरुण रोकडे, प्रदीप ठाकरे, शशिकांत पवार, सचिन सर्जे, अमृत गांगुर्डे आदी मंडळी उपस्थित होते.

जेएनपीए बंदरात बनावट दारू

। उरण । वार्ताहर ।

उत्पादन शुल्क विभाग व पोलीस यंत्रणेने सध्या दारू विक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारला नाही. त्याचा फायदा उठवत थर्टीफर्स्ट साजरा करण्यासाठी उरण, जेएनपीए बंदरातील हॉटेल, ढाबा, टपरीधारक, चायनीज सेंटर मध्ये मोठ्या प्रमाणात बनावट दारूचा साठा करण्यास व्यवसायिकांनी सुरुवात केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. बनावट दारूमुळे शासनाचा लाखो रुपयाचा कर बुडणार असून सदर दारूच्या सेवनामुळे तेलीराम बरोबर युवकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो अशी भिंती जनमानसात व्यक्त केली

जात आहे.

नवीमुंबई पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी हे उरण, जेएनपीए बंदरातील अवैध धंद्यांवर कारवाईचा बडगा उगारतांना दिसत नाहीत. त्यामुळे दारु विक्रेत्यांना त्यांचा धाक राहिला नाही. त्यामुळे अवैध धंद्याची संख्या बळावली आहे. याचा फायदा उठवत उरण, जेएनपीए बंदर परिसरातील हॉटेल, ढाबा, टपरीधारक, चायनीज सेंटर तसेच पार्किंग वर सर्रासपणे शासनाचा लाखो रुपयाचा कर बुडवून रात्री अपरात्री खुलेआम व्यवसायीक दारु बरोबर अंमली पदार्थांची विक्री करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यात काही दारु विक्रेते हे पैशांच्या लोभापायी पोलीस व उत्पादन शुल्क विभागाच्या काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून दारु मध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ करत आहेत.ही भेसळयुक्त व बनावट दारू पिल्याने अनेकांना शारीरिक, मानसिक

उत्पादनशुल्क विभागाचे दुर्लक्ष

आजारांचा सामना करावा लागत आहे. यावर्षी थर्टी फर्स्ट शनिवारी (दि.३१) येत असल्याने उरण, जेएनपीए बंदर परिसरातील हॉटेल, ढाबा, टपरीधारक, चायनीज सेंटर आणि पार्किंगमध्ये मोठ्या प्रमाणात दारु विक्रेत्यांनी शासनाचा लाखो रुपयाचा कर बुडवून भेसळयुक्त व बनावट दारू जमवाजमव करण्यास सुरुवात केल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. अशा भेसळयुक्त व बनावट दारूच्या सेवनामुळे या अगोदर अनेकांना प्राण गमवावे लागले आहे. यावर्षीच्या थर्टी फर्स्ट मध्ये बनावट दारु सेवनामुळे जीवितास धोका निर्माण होऊ शकतो.

आपटा येथे जलजीवन योजना

। आपटा । वार्ताहर।

आपटा येथे केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून जलजीवन योजना सुरु करण्यात आली आहे. ही योजना नियमित सुरु राहण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.

याबाबत चर्चा करण्यासाठी ग्रामस्थांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सरपंच नाजनीन पटेल उपसरपंच मयुर शेलार ग्रामविकास अधिकारी शेडगे, वृषभ धुमाळ, मारुती चव्हाण व सदस्य व ॲड संजय टेंबे, गणेश सावंत, स्वप्नील भोवड, गोपाळ सावंत, मृणाल कुलकर्णी, हेटवणे पाणी कमिटी अध्यक्ष सैजाद यांच्यासह

योजनेचे ठेकेदार, जिल्हा परिषदेचे मिटकरी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत गावातील जलजीवन योजना केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सुरु केली आहे ती आता सुरळीतपणे सुरु ठेवण्यासाठी सर्वांनीच कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. या योजनेच्या माध्यमातून गावासाठी पाणी घ्यावे असे ठरविण्यात आले. या योजनेचा लाभ घ्यावा व गावासाठी पाणी पुरवठा सुरू करावे असे सर्व ग्रामस्थ यांनी सांगितले. योजना एक कोटी पन्नास लाख रुपयांची आहे.

दिव्यांगांना प्रमाणपत्रांचे वाटप

। अलिबाग । वार्ताहर ।

आजादी का अमृत महोत्सव मोहिमेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना विविध शासकीय सोयी सुविधांसाठी आवश्यक असलेले दिव्यांग प्रमाणपत्र व युडीआयडी कार्ड तातडीने वितरित करण्यासाठी जिल्हा रुग्णालय अलिबाग मार्फत दिव्यांग प्रमाणपत्र विषयक बोर्ड स्थापन करून दिव्यांग प्रमाणपत्र मोठ्या प्रमाणात वितरित करण्यात आली.

सदर मोहिमेअंतर्गत रायगड जिल्ह्याने दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे महाराष्ट्र राज्य यांनी प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार ९५ टक्के दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्रे वितरित करून राज्यामध्ये सातवा क्रमांक मिळविला. दिव्यांग प्रमाणपत्र वितरणासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद गवई, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र रोकडे, डॉ. गजानन गुंजकर यांनी विशेष नियोजन व मार्गदर्शन केले.

या मोहिमेसाठी वैद्यकीय अधीक्षक व तज्ञ वैद्यकीय अधिकारी, तांत्रिक कर्मचारी व राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी/कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेऊन दिव्यांग बांधवाना त्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र वितरित करण्यासाठी व सदर मोहीम यशस्वी करण्यासाठी व रायगड जिल्ह्याची कामगिरी उल्लेखनीय करण्यास मोलाचा वाटा उचलला.

पत्रकार संघाच्या महाआरोग्य मेळाव्यास प्रतिसाद

। नेरळ । प्रतिनिधी ।

कोकण विभाग पत्रकार संघाने आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबिरास मोठा प्रतिसाद लाभला. यामध्ये ५०० हून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातील २०० रुग्णांना चष्मे वाटप करण्यात आले. ८०० हून अधिक आदिवासी व्यक्तींना ब्लँकेट वाटप करण्यात आले.

आदिवासी बहुल भागातील नागरिकांना आरोग्यसेवा मिळावी यासाठी कोकण पत्रकार संघाने पाथरजमधील मार्गाचीवाडी येथे आदिवासी लोकांना ब्लँकेट वाटप तसेच आरोग्य शिबिराचे आयोजन

करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष दीपक बोराडे, पाथरजच्या सरपंच जोत्स्ना घोडविंदे,राधामीरा ट्रस्टचे व्यवस्थापक रंजन पिल्लई, महेश आगे, ग्रामसेवक बाळकृष्ण मोरे, गणेश तिखंडे, ममता जितवानी, तसेच अंकुश घोडविंदे, प्रा.रमेश चव्हाण, जनार्दन पानमंद, शरद तवळे, कांता पादिर, मंगळ केवारी, अश्विन पादिर, सीताराम केवारी आदी उपस्थित होते.

या आरोग्य शिबिरात डॉ. भगवान कराळे, डॉ. निलेश यादव, डॉ. साजुका काठे, डॉ. संजीवदास राव, डॉ. गणेश मेंगाल, डॉ. आप्पा गोगाककर यांनी केली. तसेच डॉ. कमलेश खाडे, डॉ. राकेश पाटील, डॉ. भारद्वाज यांनी तपासण्या केल्या. यावेळी कळंब आणि खांडस प्राथमिक आरोग्य केंद्राकडून रुग्णांच्या ईसीजी आणि रक्तचाचण्या केल्या. या शिबिरात सुमारे २०० गरजू रुग्णांना पत्रकार संघाकडून चष्म्याचे वाटप करण्यात आले.तर राधामीरा चॅरिटेबल ट्रस्टचे वतीने ८०० आदिवासी बांधवाना ब्लँकेटचे महिलांना साड्या व मिठाईचे वाटप केले. तर युनिकोन सिक्युरिटीकडून २५ बेरोजगार तरूणांची रोजगार नोंदणी केली शिबिरात वारे कृषी विद्यालयाच्या शिक्षक विद्यार्थी, तसेच शिवक्रांती सामाजिक संस्थेचे अविनाश भोईर, परिवर्तन फाउंडेशनचे सुनील म्हसे यांनी शिबीर यशस्वी होण्यासाठी मदत केली.

स्वप्नातील गावांच्या विकासासाठी पुढाकार

कृषी अधीक्षक कार्यालय – स्वदेस फाउंडेशन यांचा सामंजस्य करार

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, रायगड व स्वदेस फाउंडेशन यांचे मध्ये सात तालुक्यामधील शेतकऱ्याचा विकास करण्यासाठी कृषी विकास कार्यक्रमांतर्गत सामंजस्य करार नुकताच करण्यात आला. सामंजस्य करारावर स्वदेस फाउंडेशनच्या संस्थापक झरीना स्क्रूवाला व उज्वला बाणखेले, प्रकल्प संचालक आत्मा तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सह्या केल्या. यावेळी स्वदेस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे, संचालक प्रदीप साठे, उपसंचालक तुषार इनामदार, नीता हरमलकर, महाव्यवस्थापक प्रसाद पाटील,

अफशान शेख, दत्तात्रय काळभोर, उपसंचालक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रायगड, सतीश बोऱ्हाडे उपसंचालक आत्मा तथा नोडल अधिकारी (स्मार्ट)आणि भाऊसाहेब गावडे पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ, जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) उपस्थित होते.

> सामंजस्य कराराचा फायदा स्वदेस फाऊंडेशन अंतर्गत असणाऱ्या स्वप्नातील गावांमधील शेतकऱ्यांना होणार असून कृषी विभागाच्या योजना जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्वदेस फाउंडेशन व कृषी विभाग प्रयत्न करेल
> – मंगेश वांगे,सीईओ,स्वदेस

> सामंजस्य करारामुळे दक्षिण रायगड मधील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी स्वदेस फाउंडेशन बरोबर कृषी विभाग एकत्रितपणे काम करेल असे नमूद करून कृषी विभागाच्या योजनांचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा.
> – उज्वला बाणखेले, जिल्हा कृषी अधीक्षक

कृषीविकासाला प्राधान्य

सामंजस्य करार अंतर्गत रायगड जिल्ह्यामध्ये स्वदेस फाउंडेशन काम करत असलेल्या गावांमध्ये तीन वर्षांमध्ये पोलादपूर, महाड, माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन व सुधागड तालुक्यामधील शेतकऱ्यांसाठी कृषी विस्तार कार्यक्रमांतर्गत मँगो नेट नोंदणी, मँगो जीआय नोंदणी, शेतकरी कंपनीची स्थापना, शेतकरी गट निर्मिती, प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग योजना प्रकल्प अंमलबजावणी, स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत शेतकऱ्यांना लाभ, बांबू विलेज निर्मिती, किसान क्रेडिट कार्ड नोंदणी व लाभ, सौर ऊर्जा कुंपण लाभ, प्रधानमंत्री पिक विमा योजना लाभ व शेतकऱ्यांना विविध प्रशिक्षण या विषयांवर स्वदेस फाउंडेशन व कृषी विभाग एकत्रितपणे समन्वयाने काम करणार आहेत.उपसंचालक तुषार इनामदार यांनी आभार मानले.

आरोग्याचा संदेश देत पायी अष्टविनायक यात्रा

। पाली । वार्ताहर ।

पायी चालण्याचे महत्त्व सांगत सोबत आध्यात्मिक वारसा पुढच्या पिढीने जतन करावा या उद्देशाने जुनी सांगवी येथील श्याम गुरव यांनी परिवारासह ५२० किलोमीटर पायी अष्टविनायक दर्शन यात्रा पूर्ण केली आहे. आरोग्याचा संदेश देत ही पायी यात्रा करण्याचा संकल्प त्यांनी केला होता. सलग २१ दिवस रोज साधारण २५ कि.मी.चा पायी प्रवास करत श्याम गुरव, त्यांची बहीण मेधा, मेहुणे मंगेश गुरव, मुलगा पूर्वेश गुरव यांनी आरोग्याचा जागर व्हावा, त्यासोबत देवदर्शनही घडावे या उद्देशाने अष्टविनायक पायी यात्रा बल्लाळेश्वराच्या दर्शनाने पूर्ण केली आहे.

दोन डिसेंबर रोजी मोरगाव येथील गणपतीपासून त्यांनी सुरुवात केली. पाच डिसेंबरला दौंडजवळील सिद्धटेक, नऊ डिसेंबर थेऊर, १० डिसेंबर रांजणगाव, लेण्याद्री व ओझरच्या दिशेने पुढे पायी परिक्रमा सुरू ठेवली. महड, पाली, प्रवास करून या पायी यात्रेची २१ डिसेंबरला पालीच्या बल्लाळेश्वर मंदिरात सांगता करण्यात आली. गुरव हे कामगार कार्यालयातून सेवानिवृत्त आहेत. त्यांचे मेहुणे मंगेश पवार हे खासगी कंपनीतून सेवानिवृत्त आहेत, तर बहीण मेधा गुरव या जिल्हा परिषद शिक्षिका सेवेतून सेवानिवृत्त आहेत.

संपादकीय

ठरावाचे राजकारण

महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नी मंगळवारी राज्य विधानसभेत अखेर एकमताने ठराव संमत झाला. हा वाद सुरू झाला तेव्हाच आणि विधानसभा अधिवेशन सुरू होण्यापूर्वी दैनिक कृषीवलने ही सूचना केली होती. त्यानंतर विरोधकांनीही याबाबत आग्रह धरला. कर्नाटक सरकारची चढेल आणि आक्रमक भूमिका लक्षात घेता महाराष्ट्राने तिला खरं तर ताबडतोब आणि अधिक कडक जबाब देण्याची गरज होती. संपूर्ण महाराष्ट्र या प्रश्नावर एक आहे असे दाखवणे आवश्यक होते. पण शिंदे-फडणवीस सरकार त्यात अनाकलनीय रीत्या चालढकल करीत होते. अखेर विरोधी मताचा दबाव फारच वाढल्याने त्यांचाही नाईलाज झाला व मंगळवारी हा ठराव मांडण्यात आला. जत आणि अक्कलकोटमधील गावे कर्नाटकात सामील करून घेतली जातील अशी घोषणा करून कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी या वादाला सुरूवात केली. हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात आहे तोवर यात काहीही होण्यासारखे नाही हे महाराष्ट्रातील नेत्यांना ठाऊक आहे. पण कर्नाटकात लवकरच निवडणुका होणार असल्याने कन्नड भाषकांच्या भावना भडकावण्यासाठी तेथील भाजपच्या सरकारने हा विषय मुद्दाम उकरून काढला व ते आजही मराठी जनतेला ललकारावे असेच बोलत आहेत. या प्रश्नी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली हे जणू त्यांचे आपल्यावर उपकार झाले अशा थाटात एकनाथ शिंदे वारंवार बोलत असतात. पण शाह यांनी दोन्ही राज्यांना सबुरीचा सल्ला दिल्यानंतरही बोम्मई का गप्प राहिलेले नाहीत याचे उत्तर शिंदे यांनी द्यायला हवे. कर्नाटक सरकार रोज आगीत तेल ओतण्याचे उद्योग करीत आहे. महाराष्ट्राला एक इंचही जमीन दिली जाणार नाही असा ठराव कर्नाटक विधानसभेत संमत करून घेण्यात आला. बेळगावात प्रवेश करू पाहणाऱ्या आंदोलकांना सीमेवरच रोखण्यात आले आणि महाराष्ट्र एकीकरण समितीचा कार्यक्रम ऐन वेळी रद्द करायला लावण्यात आला. त्यामुळे, भाजपच्या राजकारणासाठी कर्नाटक सरकारने वाटेल ते केले तरी महाराष्ट्राने गप्प राहायचे असा आदेश शाह यांच्या बैठकीत देण्यात आला होता की काय असा प्रश्न उपस्थित होतो. महाराष्ट्राने उशिराने ठराव करण्यामागचे कारणही हेच असावे असे कोणाला वाटले तर त्याची चूक म्हणता येणार नाही. त्यातही काल सोमवारी हा ठराव होईल असं वाटत असताना मुख्यमंत्री दिल्लीला गेल्यामुळे अनेक तर्क करण्यात आले. गुरु गोविंदसिंगाच्या कार्यक्रमासाठी मोदींच्या निमंत्रणावरून आपण तेथे गेलो असा खुलासा शिंदे यांनी केला. पण विधानसभेचे अधिवेशन चालू असताना मुंबईहून दिल्लीला जाण्याइतका हा कार्यक्रम महत्वाचा होता काय हा प्रश्न आहे. यातून जे सूचित होतं त्यानुसार, हा ठराव करण्यासाठी शिंदे यांना खरोखरच जर दिल्लीची परवानगी घ्यावी लागत असेल तर ती भयंकर नामुष्कीची बाब म्हणायला हवी. राज्याची इतकी दयनीय अवस्था काँग्रेसचे पक्षश्रेष्ठी मजबूत असण्याच्या काळातही झाली नव्हती. वाईट बाब म्हणजे, जिकडे-तिकडे पक्षीय राजकारण करण्याची आपली सवय शिंदे-फडणवीस सरकारला याही वेळी बाजूला सारता आली नाही. ठरावाबद्दल आभार मानताना शिंदे यांनी महाविकास आघाडीच्या काळात सीमावासियांसाठी काहीच करण्यात आले नाही व ते आता आपले सरकार करीत आहे अशी शेखी मिरवण्याचा प्रयत्न केला. यामुळे एकमताच्या ठरावाचे सर्व गांभीर्य नष्ट झाले. महाराष्ट्रातील राजकारण हे किती खालच्या पातळीला गेले आहे त्याचा हा दारुण नमुना होता. यातील दुर्दैवाची बाब अशी की, भाजपच्या दिल्लीतील सत्ताधाऱ्यांना ना महाराष्ट्राविषयी प्रेम आहे ना कर्नाटकाविषयी. राज्य भाजपचे नेते विदर्भाचे स्वतंत्र राज्य होण्याच्या बाजूचे असताना त्यांना बेळगाव प्रश्नाबाबत काहीही आच वाटण्याची शक्यता नाही. यामुळेच भूतकाळात सीमा प्रश्नावरील आंदोलनात भाजपच्या नेत्यांनी कधीही फारसा सहभाग घेतल्याची नोंद नाही. शेकाप, डावे पक्ष आणि शिवसेना यांनीच तो मुख्यतः लावून धरला आहे. एकनाथ शिंदे हे कधीकाळी या आंदोलनात सहभागी झाले असतीलही. पण आज मात्र ते भाजपच्या कच्छपी लागले आहेत. त्यामुळे ठराव झाला तरी नंतर त्यांचे सरकार ठोस कृती करते का हे पाहावे लागेल.

केवळ अविस्मरणीय

अजित भिडे

यंदाचा फिफा विश्वचषक अनेकार्थाने वेगळा होता. प्रथमच मध्यपूर्व देशामध्ये ही स्पर्धा होत होती. खेरीज एरवी उन्हाळ्यात आयोजित होणारे हे सामने प्रथमच हिवाळ्यात होत होते आणि प्रचंड प्रेक्षकवर्ग असणारे दोन दिग्गज आपला शेवटचा फिफा विश्वचषक खेळत होते. मात्र त्यांच्याबरोबर यंदा नवीन खेळाडूदेखील चमकून गेले. त्यामुळे कतारमधून बाहेर पडताना प्रेक्षकांच्या तोंडी मेस्सीबरोबरच रामोस, एम्बाप्पेचेही कौतुक होते.

फिफा विश्वचषकाचे सूप वाजले आणि लिओनेल मेस्सीच्या नावाचा जयघोष करत आम्ही स्टेडिअमच्या बाहेर पडलो तेव्हा एक अविस्मरणीय अनुभव सोबत घेऊन जात असल्याचे विलक्षण समाधान होते. याआधीच्या म्हणजेच पोर्तुगाल-घाना आणि जपान-जर्मनीमधील सामने मी पाहिले होते. त्यामध्ये आणि अखेरच्या सामन्यातला फरक असा की, आधीच्या स्पर्धांमध्ये त्या त्या देशांच्या नागरिकांचे प्रमाण जास्त होते. ते आपल्या खेळाडूंना पाठिंबा देत होते. पण शेवटच्या स्पर्धेत मात्र मेस्सीच हिरो असल्यामुळे मैदानावर सर्व दिशांनी त्याच्याच नावाचा जल्लोश सुरू होता. थोडक्यात, अर्जेंटिनाच ही अंतिम स्पर्धा जिंकणार, असा माहोल आधीपासूनच तयार झाला होता. बरेचजण अर्जेंटिनाची जर्सी घालून आले होते.

त्यामुळे मैदानावर निळाई अवतरल्याचा भास होत होता. त्या दिवशीची मॅच सुरू झाली, अर्जेंटिनाने दोन गोल केले आणि ६७ मिनिटांपर्यंत ही मॅच एकतर्फी असल्यासारखे वाटत होते. तोपर्यंत फ्रान्सचा स्कोअर शून्य होता. पण त्या संघाने ६७ व्या मिनिटाला पहिला गोल केला आणि पुढच्या पाच-सात मिनिटांमध्ये दुसराही गोल केला तेव्हा मात्र खरी चुरस सुरू झाली. याचे कारण यंदाचे फिफाचे वैशिष्ट्यच होते की, ९० मिनिटे संपल्यानंतर तीस मिनिटांच्या अतिरिक्त वेळेत पुन्हा सामन्याचे चित्र बदलताना दिसले होते. याच वेळेत सगळे निकाल बदलले होते. त्यामुळे आधी अर्जेंटिनाच्या विजयाबद्दल खात्री असणारे सगळेच चिंतेत पडले होते. अनेकजण डोक्याला हात लावून बसले होते. तीन-तीन अशी बरोबरी साधत ९० मिनिटे संपल्यानंतर पेनल्टी शूटआऊटसाठी ३० मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला गेला. त्यात ४-२ ने अर्जेंटिनाचा विजय झाला आणि जल्लोशाने आसमंत दणाणून गेला. त्याचे वर्णन शब्दात करता येणे केवळ अशक्य आहे.

यंदाचा फिफा विश्वचषक अनेकार्थाने वेगळा होता. प्रथमच मध्यपूर्व देशामध्ये ही स्पर्धा होत होती. खेरीज एरवी उन्हाळ्यात आयोजित होणारे हे सामने प्रथमच हिवाळ्यात होत होते आणि प्रचंड प्रेक्षकवर्ग असणारे दोन दिग्गज आपला शेवटचा फिफा विश्वचषक खेळत होते. मात्र त्यांच्याबरोबर यंदा नवीन खेळाडूदेखील चमकून गेले. त्यामुळे कतारमधून बाहेर पडताना प्रेक्षकांच्या तोंडी मेस्सीबरोबरच रामोस, एम्बाप्पेचेही कौतुक ऐकायला मिळत होते. अंतिम स्पर्धेच्या दिवशी कतारचा राष्ट्रीय दिनदेखील होता. त्यामुळे सगळीकडेच प्रचंड गर्दी होती. या देशाने स्टेडिअमवर पोहोचण्यासाठी मेट्रो आणि बससेवा विनाशुल्क ठेवली होती. पण राष्ट्रीय दिवस असल्यामुळे स्थानिकदेखील बाहेर पडले होते. असे असूनही त्यांनी आदर्श नियोजनाचा वस्तुपाठ दाखवला. दोन तासांसाठी मेट्रोचे सगळे रुट बंद केले गेले आणि फक्त स्टेडिअमकडील रुट सुरू ठेवण्यात आले. त्यामुळे प्रेक्षकांचा प्रवास सुकर झाला. एकूणच पूर्ण स्पर्धेदरम्यान कोणाची कोणतीही गैरसोय झाली नाही. रस्ता सांगायला ठिकठिकाणी स्वयंसेवक तैनात होते. अंतिम मॅचच्या दिवशी तर दुपारी साडेचार वाजल्यापासून राजाच्या हस्ते पुरस्कार देण्यापर्यंतचा सगळा सोहळा अविस्मरणीयच होता.

कतारसारख्या देशात फिफाचे आयोजन चर्चेची राळ उडवणारे ठरले होते. ऐन वेळी बडवायजरने अल्कोहोलविरहीत पेय बाजारात आणले. खरं तर फिफा आणि अल्कोहोल हे समीकरण झाल्यासारखी स्थिती होती. त्यामुळेच कतारच्या प्रशासनाने 'स्टेडियमवर लिकर मिळणार नाही' म्हटल्यावर बरेच लोक नाराज झाले होते. मग हे लोक मजा करण्यासाठी दुबईला जायचे आणि मॅच बघायला तिथून विमानाने कतारला परत यायचे. अगदी शेवटच्या दिवशी काही प्रमाणात लिकर सर्व्ह केली गेली, पण सरसकट परवानगी नव्हतीच. दुसरा भाग म्हणजे भारतीय माणूस अंग झाकणारे कपडे घालतो, मात्र युरोपियन लोकांनी त्यांच्या पद्धतीनेच कपडे घालते होते. अर्थात कतारनं त्यावर आक्षेप घेतल्याचे दिसले नाही. अर्जेंटिनाला पाठिंबा देताना अनेकांनी टी शर्टच काढून टाकले होते, पण हे सगळे कतारतर्फे खिलाडूवृत्तीने घेतले गेले. मॅचेसबरोबरच अनेकांनी कतारच्या संस्कृतीचा, या देशातल्या प्रेक्षणिक स्थळांना भेटी देण्याचाही आनंद लुटला. तिथले मॉल पाहिले. तिथे सुक वाकिब नावाचा भाग आहे. ही जुनी बाजारपेठ असून त्यात मसाल्याचे पदार्थ, खजूर, केशर आदी घटक मिळतात. हा भाग वगळता कतारच्या सगळ्या भागात विलक्षण चकचकाट दिसतो. नव्या-जुन्यातील फरक बघण्याचा अनुभवही छान होता.

अर्थात हे सगळे असले तरी यंदाच्या फिफामध्ये खरी चर्चा रंगली ती मेस्सीची... वयाच्या अकराव्या वर्षी 'ग्रोथ हार्मोन डेफिशियन्सी' (जीएचडी) शी झुंज देण्यापासून जगातील महान फुटबॉलपटू बनण्यापर्यंतचा मेस्सीचा प्रवास ही उत्कटता, जिद्द आणि चिकाटीची अनोखी कहाणी आहे आणि अंतिम फेरीत त्याने विजेतेपद पटकावले. तो एक जिवंत आख्यायिका बनला आहे. आता मॅराडोना आणि मेस्सी यांच्यात श्रेष्ठ कोण, या चर्चेलाही पूर्णविराम मिळणार आहे. सात वेळा बॅलन डी'ओर, सहा वेळा युरोपीयन 'गोल्डन शूज'चा विक्रम, बार्सिलोनासोबत विक्रमी ३५ जेतेपदे, ला लीगमध्ये ४७४ गोल, एका क्लबसाठी (बार्सिलोना) ६७२ गोल... गणती करावी तेवढी थोडी! मेस्सीला विश्वचषक न जिंकण्याचे दुखणे नेहमीच वाटत होते. ही त्याची शेवटची संधी होती. २३ व्या मिनिटाला पेनल्टीवर गोल करण्याआधी त्याने बहुधा त्याच वचनाची आंधळेपणाने पुनरावृत्ती केली होती. १९८६ मध्ये अर्जेंटिनाने शेवटचा विश्वचषक जिंकला, तेव्हा मॅराडोना देशासाठी देव बनला. तेव्हा त्याने अंतिम फेरीत गोल केला नव्हता. विश्वचषक न जिंकल्यामुळे मेस्सीच्या महानतेवर वारंवार बोटं उचलली जात होती. २०१४ च्या विश्वचषक स्पर्धेतल्या अंतिम सामन्यात जर्मनीने अर्जेंटिनाचा एका गोलने पराभव केल्यावरही त्याच्या क्षमतेपुढे प्रश्न उपस्थित केले गेले होते. या विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात सौदी अरेबियाने मेस्सीच्या संघावर अनपेक्षित विजय नोंदवला, तेव्हाही प्रश्न निर्माण झाले. जणू तो पराभव अर्जेंटिना आणि मेस्सीसाठी जीवनदायी ठरला.

पराभवाच्या दुःखात मेस्सी आणि अर्जेंटिनाच्या चाहत्यांना जगाने अनेक वेळा अश्रू ढाळताना पाहिले; मात्र रविवारी मेस्सीच्या चेहऱ्यावरील दिलासा आणि निवांत हास्याने सर्व चाहत्यांना अविस्मरणीय आनंद दिला. मेस्सीच्या नशिबात ही रात्र अनेक अमावस्यांनंतर आली. २०१४ च्या विश्वचषक स्पर्धेमध्येही अर्जेंटिनाचा संघ अंतिम फेरीत पोहोचला होता. मेस्सी जेतेपदापासून केवळ एक पाऊल दूर होता. मात्र जर्मनीने अर्जेंटिनाचा १-0 असा पराभव करून विश्वचषक जिंकला. त्या सामन्यात मेस्सीला एकही गोल करता आला नाही. त्यामुळे तो खूप भावूक झाला. २०१६ मध्ये अर्जेंटिनाला कोपा अमेरिका स्पर्धेचे जेतेपद पटकावण्याची संधी होती. समोर चिलीचा संघ होता. हा सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये गेला आणि तिथे अर्जेंटिनाचा पराभव झाला. शूटआऊटमध्ये मेस्सीचा गोल हुकला. गोलपोस्टला धरून बराच वेळ रडत राहिलेल्या मेस्सीचे ते चित्र क्वचितच कोणी विसरले असेल.

२०१८ च्या फिफा विश्वचषक स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सने अर्जेंटिनाचा ४-३ असा पराभव केला आणि मेस्सीचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला. ही रात्रही मेस्सीसाठी अश्रू घेऊन आली. प्रत्येक पराभवावर चाहते मेस्सीला भावूक होताना बघत होते. आज संपूर्ण अर्जेंटिना संघ रडत होता. प्रत्येक चाहत्याचे डोळे ओले होते आणि मेस्सी हसत होता, कारण अश्रूंची फुले झाली होती! त्याच्या जिद्दीची ही कहाणी अवघ्या जगासाठी प्रेरणादायी आहे. हा क्षण आमच्यासारख्या चाहत्यांसाठी अविस्मरणीय होता. अंतिम फेरीतल्या या सामन्याचे गारुड चाहत्यांच्या नजरेसमोरुन जाणार नाही. आयुष्यभर तो दिवस, तो प्रसंग आठवणीमध्ये राहील.

लोकायुक्त आणि सत्तार प्रकरण

शिंदे- फडणवीस लोकायुक्त विधेयक कोणत्या नैतिक अधिकारात मांडणार असा प्रश्न मंत्रीमंडळातले त्यांचे सहकारी अब्दुल सत्तार यांचे जे दोन मोठे घोटाळे काल विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांनी विधानसभेत उघड केले त्यावरून पडला आहे.

गायरान जमिनी कोणत्याही व्यक्तीच्या नावे करता येत नाहीत असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. जिल्हा न्यायालयानं ही बाब पुरेशी स्पष्ट केलेली असतांना आणि सगळी कागदपत्र समोर असतांना अब्दुल सत्तार यांनी ती जमीन सगळे कायदे धाब्यावर बसवून एका व्यक्तीला दिली,या जमिनीची किंमत तब्बल दीडशे कोटी आहे. हा गैरप्रकार आहे हे शिंदे- फडणवीस सरकारच्याच जिल्हाधिकाऱ्यांनी लेखी कळवूनही शिंदे- फडणवीसांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. कदाचित आज जुजबी चौकशी जाहीर करतील.

दुसरा प्रकार अजून गंभीर आहे. स्वतःच्या मतदार संघात एक महागडा प्रचार महोत्सव करण्यासाठी सत्तारांनी संपूर्ण कृषी खातं वेठीला धरल्याचं समोर आलंय. प्लॅटिनम, डायमंड, गोल्ड आणि सिल्वर असे कोडवर्ड देऊन शासकीय अधिकाऱ्यांना हे पास विकण्याची सक्ती केली आणि राज्यातल्या कृषी दुकानांना किमान पाच हजाराचा पास घेण्याची सक्ती केली असा आरोप आहे. किमान पंधरा कोटी यातून गोळा केल्याचा अंदाज आहे.

शिंदे- फडणवीस सरकार पहिल्या दिवसापासून 'निर्ढावलेलं' आहे हे ज्या प्रकारे संजय राठोड मंत्री झाले त्यावरून दिसलं आहे. दरम्यान हे 'कृषीमंत्री अब्दुल सत्तार आमच्या मराठवाड्याचे आहेत आणि आमच्या मानवत जवळच्या मानोली नावाच्या गावात एकाच आठवड्यात तब्बल चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शिंदे फडणवीस दोघांनीही अंतर्मनाला विचारावं की चार शेतकरी एकाच आठवड्यात आत्महत्या करत असतांना आपला मंत्री बेकायदेशीर मार्गानं पंधरा कोटीचा महोत्सव करतो हे सरकारसाठी लाजिरवाणं आहे की नाही?

या प्रश्नाचं उत्तर त्यांना नकारार्थी मिळत असेल तर सत्तारांना पदावर ठेऊन खुशाल लोकायुक्त विधेयक मांडावं.

विश्वंभर चौधरी

.....

काही वर्षांपूर्वी ख्रिसमसच्या काळात युरोपात वास्तव्याला होतो. जसा ख्रिसमस जवळ येऊ लागला तशी नयनरम्य रोषणाईने घरे, बाजारपेठा सजू लागल्या. नदीकाठी आणि बागांमध्ये ख्रिसमस मार्केट सजू लागली. स्वीटस्, हॉट वाईन, हस्तकलेच्या वस्तू, शिवणकाम, विणकाम केलेले कपडे, काचा वितळवून त्यापासून बनवून मिळणाऱ्या शोभेच्या वस्तू वगैरे मालाची रेलचेल होती. ही सगळी तयारी बघून ख्रिसमसच्या दिवशी जंगी सेलिब्रेशन बघायला मिळणार याची खात्री वाटली.

ख्रिसमसचा दिवस उजाडला त्यादिवशी सगळा सन्नाटा होता. रस्त्यावर चिटपाखरू दिसेना. दुकाने वगैरे सगळं काही बंद होतं. जणू कुठल्यातरी राजकीय संघटनेने बंद पुकारला असावा तशी शांतता होती. मंडप, कमानी, शोभायात्रा, स्पीकर्स, तुंबलेले रस्ते यातलं काहीच नव्हतं. तिथले लोक मित्र आणि नातेवाईकांसोबत घरी सण साजरा करतात अशी माहिती मिळाली.

काहीतरी बघायला मिळेल म्हणून चर्चमध्ये गेलो. पुलावरून जाताना खालून वाहणारी नदी नेहमीप्रमाणेच स्वच्छ दिसत होती. चर्च छान सजवलं होतं, पण तिथेही विशेष गर्दी नव्हती. एक माणूस पियानोवर बसून शांत रसातील 'स्टँड बाय मी' हे बेन किंगचे क्लासिक गाणे म्हणत होता. त्याला काही लोक दाद देत होते, तेवढंच. असा कोणी सण साजरा करतं का? घरात बसून शांतपणे सण साजरा केल्याने यांचा धर्म खतऱ्यात येईल अशी मला काळजी वाटू लागली.

ओंकार शिराळकर

.....

लोचा लक्षात घ्या.

रशियाची डोनबासची मागणी मान्य करायची तर चीनची अरूणाचलची मागणी मान्य करावी लागते. चीनची मागणी नाकारायची तर रशियाची मागणी नाकारावी लागते. रशियाची मागणी अमान्य केली तर रशियाकडून तेल (तेही स्वस्त) मिळणार नाही. हा लोचा मोदी कसा सोडवणार? (एकनाथ शिंदे सुटका करणार म्हणतात. शिंदेंना राज ठाकरे मदत करणार म्हणतात.) रशियानं मागणी केलीय की रशियानं गिळलेला डोनबास वगैरे विभाग युक्रेननं सोडावा आणि तो विभाग रशियाचा झाला हे मान्य करावं. चीनही म्हणतोय की अरूणाचल चीनचा आहे हे भारतानं मान्य करावं.

- निळू दामले

जो मनुष्य शत्रू आणि मित्र यांच्या ठिकाणी समान असतो, जो मानापमान, शीत-उष्ण, सुख-दुःख, स्तुती-निंदा यामध्ये समभाव राखतो, जो कुसंगापासून नेहमी मुक्त असतो, सदैव शांत आणि जे काही मिळेल त्यात संतुष्ट असतो, जो घरादाराची काळजी करीत नाही, ज्ञानामध्ये स्थित आहे आणि भक्तीमध्ये संलग्न झालेला आहे. तो मला अत्यंत प्रिय आहे.

तात्पर्य :- भक्त सदैव कुसंगापासून मुक्त असतो. मनुष्याची कधी कधी स्तुती केली जाते किंवा निंदा केली जाते, मानव-समाजाचा हा स्वभावच आहे. भक्त हा नेहमी लौकिक स्तुती-निंदा सुखदुःख इत्यादींच्या पलीकडे असतो. कृष्णकथेवाचून इतर काहीही बोलत नसल्यामुळे त्याला मौनी म्हटले जाते. मौन म्हणजे मुळीच बोलू नये असे नव्हे तर मौन म्हणजे निरर्थक काही बोलू नये. केवळ आवश्यक तितकेच बोलावे आणि भक्तासाठी आवश्यक बोलणे म्हणजे भगवत्कथा होय. भक्त हा सर्वत्र परिस्थितीमध्ये सुखी असतो, त्याला कधी कधी स्वादिष्ट रूजकर भोजन मिळेल अथवा रूचकर भोजन मिळेल अथवा कधी कधी मिळणारही नाही; परंतु तो तृप्त असतो. तो घरादाराबद्दल चिंता करीत नाही. तो कधी कधी वृक्षाखाली राहील अथवा राजवाड्यासारख्या मोठ्या इमारतीत राहील; परंतु त्याला कशाचेही आकर्षण नसते. त्याला स्थिर म्हटले जाते, कारण तो आपल्या निश्चयामध्ये ज्ञानामध्ये स्थिर असतो. भक्ताच्या गुणवर्णनात आपल्याला काही पुनरावृत्ती आढळेल; परंतु भक्ताने हे सर्व गुण प्राप्त करणे आवश्यक असल्याचे तथ्य निष्फून होऊ शकत नाही. हरावभक्तस्य कुतो महद्गुणाः-अर्थात, जो भक्त नाही त्याच्याकडे सद्गुण असूच शकत नाहीत. भक्त म्हणजे ओळखले जाण्याची ज्याची इच्छा आहे त्याने सद्गुरू विकसित केलेच पाहिजे. हे सद्गुण प्राप्त करण्यासाठी त्याला विशिष्ट बाह्य प्रयास करणे आवश्यक नाही तर कृष्णभावनेमध्ये आणि भक्तीमध्ये संलग्न झाल्याने असे गुण आपोआपच विकसित होण्यास मदत होते.

ये तु धर्मामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः।।

ये-जे; तु-परंतु; धर्म-धर्माचा; अमृतम्-अमृत; इदम्-हे; यथा-ज्याप्रमाणे; उक्तम्-सांगितले आहे; पर्युपासते-पूर्णपणे संलग्न होतात; श्रद्दधानाः-श्रद्धेने; मत्-परमाः-मलाच सर्वस्व मानून; भक्त; ते-ते; अतीव-अत्यधिक; मे-मला; प्रियाः-प्रिय.

जे या अविनाशी भक्तिमार्गाचे अनुसरण करतात आणि मला परमलक्ष्य मानून श्रद्धेने पूर्णतया संलग्न होतात ते मला अत्यधिक प्रिय आहेत.

तात्पर्यः- या अध्यायामध्ये दुसऱ्या श्लोकापासून मय्यावेश्य मनो माम्(माझ्यावर मन स्थिर करून) ते शेवटच्या श्लोकापर्यंत ये तु धर्मामृतम् इदम्(शाश्वत कार्यांचा धर्म) भगवंतांनी, त्यानां प्राप्त करण्याच्या दिव्य सेवापद्धतींचे वर्णन केले आहे. असे विधी भगवंतांना प्रिय आहेत आणि जो मनुष्य या विधींमध्ये संलग्न होतो त्याचा भगवंत स्वीकार करतात. अर्जुनाने प्रश्न विचारला होता की, यापैकी श्रेष्ठ कोण, निर्विशेष ब्रह्माच्या मार्गामध्ये संलग्न झालेला की, भगवंतांच्या प्रत्यक्ष सेवेमध्ये संलग्न झालेला? आणि भगवंत याचे इतके स्पष्ट उत्तर देतात की, आध्यात्मिक साक्षात्कारासाठी भगवद्भक्ती हा सर्वोत्तम विधी आहे. यात मुळीच संदेह नाही. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, या अध्यायात निश्चित केले आहे की, सत्संगाद्वारे गुरूचा स्वीकार करतो आणि त्यांच्याकडून श्रद्धदा, आसक्ती आणि भक्तिभावाने श्रवण, किर्तन आणि भक्तीच्या विधिनियमांचे पालन करण्यास प्रारंभ करतो. याप्रमाणे मनुष्य भगवंतांच्या दिव्य सेवेमध्ये संलग्न होतो. हाच मार्ग या अध्यायामध्ये सांगाण्यात आला आहे. म्हणून भगवत्प्राप्तीकरीता केवळ भक्ती हाच एकमेव आध्यात्मिक साक्षात्काराचा मार्ग आहे. या अध्यायात सांगितल्याप्रमाणे केवळ आध्यात्मिक साक्षात्काराकरीता, परम सत्याच्या निर्विशेष स्वरूपाची शिफारस करण्यात आली आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, मनुष्याला जोपर्यंत शुध्द भक्तांची संगत लाभात नाही तोपर्यंतच निर्विशेष ब्रह्म लाभदायक ठरू शकते.

(क्रमशः)

लोकसंसद

येणारं वरीस धोक्याचं

बुल्गारियामध्ये जन्मलेल्या बाबा वेंगा यांनी काही वर्षापूर्वी भविष्यवाणी केली असल्याची बातमी वाचनात आली त्यानुसार पुढील २०२३ मध्ये एका मोठ्या घडामोडीची शक्यता आहे. पृथ्वीची कक्षा बदलू शकते.बाबा वेंगा यांनी केलेल्या अनेक भविष्यवाणी खऱ्या ठरल्या आहेत. २०२२ वर्ष संपायला काही दिवसांचा कालावधी शिल्लक आहे आणि लोकांनी २०२३ च्या स्वागताची तयारी सुरु केली आहे. यासोबतच बुल्गारियात जन्मलेल्या बाबा वेंगा यांच्या भविष्यवाणीची पुन्हा एकदा चर्चा होऊ लागली आहे. बाबा वेंगा यांनी २०२३ सालासाठी अनेक भाकिते केली होती, ती खरी ठरली तर पृथ्वीवर कहर होईल. बाबा वेंगा यांनी १११ वर्षांपूर्वी अनेक भविष्यवाण्या केल्या होत्या, त्यापैकी अनेक आजपर्यंत खऱ्या ठरल्या आहेत.बाबा वेंगा याच्या भविष्यवाणीनुसार, २०२३ मध्ये तिसरे महायुद्ध होऊ शकते आणि यादरम्यान अणुहल्ला होऊ शकतो. यामुळे पृथ्वीवर मोठा उद्रेक होऊ शकतो. बाबा वेंगा यांच्या भविष्यवाणीला रशिया आणि युक्रेनमध्ये सुरु असलेल्या युद्धाशी जोडून तज्ज्ञ पाहत आहेत आणि असे मानले जात आहे की ते पुढील वर्षी तिसऱ्या महायुद्धाचे रुप धारण करु शकते.२०२३ मध्ये सौर वादळ किंवा सौर त्सुनामी येऊ शकते. या सौर वादळांमुळे पृथ्वीच्या चुंबकीय शक्तीवर परिणाम होईल आणि त्यामुळे पृथ्वीच्या वेगात बदल होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. २०२३ मध्ये संपूर्ण जगात अंधार पसरू शकतो. एलियन्स पृथ्वीवर हल्ला करू शकतात आणि त्यात लाखो लोकांचा मृत्यू होऊ शकतो.२०२३ पर्यंत मानव प्रयोगशाळेत जन्माला येईल. प्रयोगशाळेत लोकांचे चारित्र्य, त्वचेचा रंग ठरवला जाईल.२०२३ मध्ये अणुऊर्जा प्रकल्पाचा स्फोट होऊ शकतो, ज्यामुळे विषारी ढग आशिया खंडावर पसरण्याची शक्यता आहे. वांगेलिया पांडेवा गुश्तेरोवा तथा बाबा वंगा ही एक बुल्गेरियान अंध महिला हिने स्वतःच्या मृत्यूची देखील भविष्यवाणी वर्तवली होती त्यामुळे बाबा वंगानी जरी भविष्यवाणी वर्तवली असली तरी येणारं आगामी वर्ष धोक्याचं राहणारं नाही अशी आशा करुया

राजू जाधव, मांगूर

नेपाळमधील सत्तांतर

नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश असून भारताच्या मित्र देशांपैकी एक देश आहे. भारत आणि नेपाळची संस्कृतीही जवळपास सारखीच आहे. जगातील एकमेव हिंदू देश अशी नेपाळची ओळख आहे. स्वातंत्र्यापासून नेपाळशी आपले सौहार्दाचे संबंध आहेत. साडेचार कोटी लोकसंख्या असलेल्या आणि हिमालयाच्या कुशीत वसलेल्या या निसर्गसंपन्न देशाची भारताची मैत्री जगजाहीर होती. भारत आणि नेपाळ मैत्रीचे संबंध इतके जवळचे होते की नेपाळची सीमा देखील आपण मुक्त केली आहे म्हणजे नेपाळमधील कोणताही नागरिक व्हिसा शिवाय भारतात प्रवेश करू शकतो तसेच भारतात व्यवसायही करू शकतो. नेपाळचे लाखो नागरिक आज भारतात वास्तव करून आहेत. दोन्ही देशात रोटी बेटीचा व्यवहार देखील होतात. असे असले तरी गेल्या काही वर्षात नेपाळ आणि भारतात कटुता निर्माण झाली आहे. ही कटुता भविष्यात आणखी वाढण्याची शक्यता आहे कारण नेपाळमध्ये सत्तेत आलेले नवे सरकार हे भारत विरोधी असून चीन धार्जिणी असलेली व्यक्ती नेपाळच्या पंतप्रधानपदी विराजमान झाली आहे. कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळचे (सिपीएन) प्रमुख आणि माजी पंतप्रधान पुष्पकुमार दहल प्रचंड हे पुन्हा नेपाळचे पंतप्रधान होणार आहेत. नेपाळमध्ये नुकतीच लोकसभेची निवडणूक पार पडली मात्र या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला पूर्ण बहुमत न मिळाल्याने प्रचंड व माजी पंतप्रधान के पी शर्मा ओली यांनी युती करून सरकार स्थापनेचा दावा केला. प्रचंड व ओली शर्मा या दोन्ही नेत्यांत झालेल्या करारानुसार प्रचंड पहिले अडीच वर्ष नेपाळचे पंतप्रधान असतील तर के पी ओली शर्मा हे नंतरचे अडीच वर्ष पंतप्रधान राहतील. याचाच अर्थ पुढील पाच वर्ष हेच दोन नेते नेपाळचे पंतप्रधान राहतील आणि त्याचमुळे भारताची डोकेदुखी वाढली आहे कारण हे दोन्ही नेते भारत विरोधी असून चीन धार्जिणे आहेत. याआधी जेंव्हा जेंव्हा हे दोघे पंतप्रधानपदी विराजमान झाले त्या त्या वेळी त्यांनी कायम भारताच्या कुरापती काढून भारताला त्रास देण्याचेच काम केले. अर्थात हे सर्व त्यांनी चीनच्याच सांगण्यावरून केले हे उघड आहे. भारताच्या शेजारी असलेल्या देशांना साम, दाम, दंड, भेद या मार्गाचा वापर करून भारताविरुद्ध फितवायचे आणि स्वतः कडे वळवायचे असे चीनचे धोरण आहे. या धोरणाला बळी पडून प्रचंड आणि ओली या दोघांनी भारताला आव्हान दिले होते. त्यामुळे दोन्ही देशात कटुता निर्माण झाली होती. ओली शर्मा पंतप्रधान असताना त्यांनी अनेकदा भारत विरोधी वक्तव्य केली होती. प्रचंड हे ही भारतावर अनेकदा टीका करतात आणि नक्षलवादाचे समर्थन करतात. मागे ते पंतप्रधान असताना त्यांनी भारताचा काही भाग नेपाळच्या नकाशात दाखवला होता त्यामुळे दोन्ही देशात मोठा तणाव निर्माण झाला होता आता ही ते तीच भूमिका घेऊ शकतात. चीन त्यांना असे करण्यास बाध्य करू शकतो. मागील काही वर्षात चीनने नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. चीन नेपाळच्या सीमेवर रस्ते आणि लोहमार्ग बांधत आहे. इतकेच नाही तर भारताच्या सीमेवर असलेल्या गावांत चीनने बांधकाम केले आहे. नेपाळ लष्कराने काठमांडू-ताराई-मधेश दृतगती मार्ग बांधण्यासाठी चीनच्याच कंपनीला काम दिले आहे. आता प्रचंड पंतप्रधान बनल्यानंतर चीन नेपाळमध्ये आणखी बस्तान बसवणार त्यामुळे भारताची चिंता वाढणार आहे.

- श्याम ठाणेदार, दौंड

म ह त्त्वा चे

अमोल गुरव यांना समाजभूषण पुरस्कार

। रसायनी । वार्ताहर ।

पंढरपूर येथील स्वर्गीय हरिश्चंद्र गायकवाड बहुउद्देशीय समाजसेवी संस्था यांच्यावतीने चौक तुपगाव येथील अमोल अरुण गुरव यांना मान्यवरांच्या हस्ते समाजभुषण पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी पंढरीनाथ कदम, कृष्णांत गायकवाड, शरीफ शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

देशी दारू हस्तगत

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील पुष्पकनोड येथे विनापरवाना देशी दारूचा साथ विक्री केल्याप्रकरणी एका इसमास पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे. तालुक्यातील पुष्पकनोड सेक्टर आर ४ येथील किराणा दुकानाचे व्यवसाय करणारे हरीशंकर महानंदा पटेल (वय ५७ वर्षे) यांनी त्यांच्या दुकानात विनापरवाना देशी दारूचा साठा करून विक्री केल्याप्रकरणी त्याला ताब्यात घेण्यात आले आहे व १७ देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

नवी मुंबईत कोरोनाचे रूग्ण

। नवीमुंबई । प्रतिनिधी ।

चीनमध्ये कोरोनाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे देशात सतर्कता बाळगण्यास सुरुवात करण्यात आली आहे. नवी मुंबई शहरातही सद्यःस्थितीत कोरोनाचे फक्त तीनच सक्रिय रुग्ण असून परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे दिसत आहे.कोरोनाची लाट पुन्हा येण्याची शक्यता असल्याने प्रशासकीय यंत्रणा अलर्ट झाली आहे. केंद्रीय आरोग्य विभागाने शहरातील ऑक्सिजन प्लॉन्ट पुन्हा सक्रिय करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच अनेक ठिकाणी मास्क वापरण्याचे देखील आवाहन करण्यात येत आहे. नवी मुंबई पालिका क्षेत्रात रविवारी एक रुग्ण आढळून आला आहे. तर एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नसून मागील चार महिन्यापासून कोरोनाने मृत्यू झाल्याची देखील नोंद नाही.

उघड्या नाल्यातून पसरतेय दुर्गंधी

नागरिकांचे आरोग्य धोक्यात, बंदोबस्त करण्याची मागणी

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

पाली बसस्थानकासमोरील दोन भल्या मोठ्या व उघड्या नाल्यातून मोठ्याप्रमाणावर दुर्गंधी पसरत आहे. येथील अक्षम्य अस्वछता व असह्य दुर्गंधी यामुळे बसस्थानक व आजूबाजूच्या बाजारपेठेत येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कोरोनासारख्या जागतिक आजाराने राज्य व देशातील जनतेला बेजार केले होते, आता पुन्हा कोरोना दरवाजा ठोठावत आहे. सर्वत्र स्वच्छता व जनजागृतीवर भर दिला जातोय,

अशातच पाली बसस्थानकाचे प्रवेशद्वार असलेल्या मार्गावर मागील अनेक वर्षांपासून दोन मोठे नाले आहेत. या नाल्यात प्लास्टिक बाटल्या, कुजलेले अन्न, गटाराचे घाणीचे पाणी तुंबत असून अनेक कीटक जीवजंतूची पैदास होत आहे. शिवाय हे नाले उघडे असल्याने यातून सतत दुर्गंधी येत असते. या नाल्यात अनेकदा वाहने फसून अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या नाल्याच्या बाजूने बसस्थानकात एसटी बस शिरतात व येथूनच बाहेर देखील येतात, त्यामुळे मोठ्या अपघाताची देखील शक्यता आहे. नागरिकांची सातत्याने मागणी होऊन देखील अद्यापपर्यंत या नाल्यांच्या बाबत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली दिसत नाही. पाली बसस्थानक असल्याने या ठिकाणी सतत नागरिकांची वर्दळ व रहदारी सुरू असते, शिवाय सभोवताली दुकाने, हॉटेल, रसवंती गृह तसेच मच्छी व मटण मार्केट असल्याने नागरिकांची रेलचेल असते. त्यामुळे या नाल्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तात्काळ या नाल्याचा योग्य तो बंदोबस्त करावा अशी मागणी जन मानसातून जोर धरत आहे.

प्रशासनाचे दुर्लक्ष

पाली बसस्थानक हे अत्यंत मोक्याचे व वर्दळीचे ठिकाण आहे. मात्र या परिसरात प्रचंड घाण व दुर्गंधी असते. प्रवाशी, नागरिक विद्यार्थी नाक धरून उभे असतात. मिनिडोअर रिक्षा स्थानक देखील इथेच आहे, मात्र बसस्थानकासमोर असलेले नाले प्रशासनाला दिसत नाहीत. मोठा अपघात झाल्याशिवाय कुणाचे डोळे उघडतील असे वाटत नाही.

सुडोकू

	2		7			4		
			2			7		1
	8	4			6	2	3	5
	7		8		5	9		
	9		4		1		6	
		6	3		9		2	
8	6	7	9			3	5	
9		1			2			
		3			7		4	

मंगळवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

3	6	1	8	4	7	9	5	2
9	8	7	2	5	6	3	1	4
2	5	4	1	9	3	8	7	6
1	4	6	9	2	5	7	8	3
7	9	8	3	6	1	4	2	5
5	2	3	7	8	4	6	9	1
6	7	2	4	1	9	5	3	8
8	3	5	6	7	2	1	4	9
4	1	9	5	3	8	2	6	7

वाशीत टँकरने पाणीपुरवठा

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबई महानगर पालिकेकडे स्वतःच्या मालकीचे धरण आणि पुरेसा पाणीसाठा असतानाही मानवी चुकांमुळे अडीच दिवसापासून वाशीत अघोषित पाणीबाणी झाली आहे. विनापरवानगी खोदकाम केल्याने पाण्याची वाहिनी फुटल्याने व वेळेवर दुरुस्ती करण्यात अपयश आल्याने आता टँकरने पाणीपुरवठा करण्याची नामुष्की मनपावर आली आहे.

नवी मुंबईचे दादर म्हणून ओळख असलेल्या वाशीत तीन दिवसापासून पाणी नाही. सेक्टर ९ येथे जमिनीखाली केबल टाकणाऱ्या एका अज्ञात व्यक्तीकडून पाण्याची वाहिनी फुटली. त्यावेळीही मोठ्या प्रमाणात पाणी वाया गेले. पाण्याची वाहिनीच फुटल्याने तेथील पाणीपुरवठा बंद करण्यात आला. मात्र त्यामुळे सद्यस्थितीत या वाहिनीद्वारा पाणी पुरवठा

होत असल्याने सेक्टर ९, १०, १० अ, आणि १५ मध्ये पाणी पुरवठा बंद झाला आहे. वाहिनीचे दुरुस्ती काम युद्धपातळीवर सुरु करण्यात आले असल्याचे मनपा पाणी पुरवठा विभागाकडून सांगण्यात येत असले तरी आजचा तिसरा दिवस असून अजून हे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे ज्या ठिकाणी पाणीपुरवठा बंद झाला अशा ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्याची नामुष्की मनपावर ओढवली आहे.

सायबर चोराचा महिलेला गंडा

नवी मुंबई :आर्मीमध्ये अधिकारी असल्याचे भासवून एका सायबर चोराने सानपाडा येथे राहणाऱ्या ६५ वर्षीय महिलेला एक लाखांचा गंडा घातल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणी अज्ञात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार सानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेत फसवणूक झालेली ६५ वर्षीय महिला सानपाडा येथे मुलासह राहते. तिच्या मालकीचा मुंबईतील सायन भागात एक फ्लॅट आहे. हा फ्लॅट भाड्याने देण्यासाठी त्यांनी वेबसाईटवर जाहिरात टाकली होती. हीच जाहिरात बघून रणदीप सिंग नामक व्यक्तीने या महिलेच्या मोबाईलवर संपर्क साधत होत्या. त्यावेळी आर्मीमध्ये अधिकारी असल्याचे सांगून त्यांचा सायन येथील फ्लॅट भाड्याने घेण्यासाठी इच्छुक असल्याचे महिलेला सांगितले होते. त्यानंतर रणदीप सिंग याने डिपॉझिटची रक्कम इंडीयन आर्मीच्या अकाऊंटवरुन पाठवणार असल्याचे सांगून मासिक भाड्याची रक्कम पाठवण्याच्या बहाण्याने महिलेकडून युपीआय आयडीची मागणी करून दोन लिंक पाठवून दिल्या. पण या दोन्ही लिंक उघडल्यानंतर महिलेच्या बँकेतून एक लाखाची रक्कम काढून घेण्यात आली. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सानपाडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

कोकण पदवीधरसाठी मनसेची मोर्चेबांधणी

। आगरदांडा । वार्ताहर ।

कोकण पदवीधर मतदार संघाची निवडणूक लढवण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आपली तयारी सुरु केली आहे. लवकरच या निवडणूक होणार असून पदवीधर तरुणांना आपल्याकडे खेचण्यासाठी निवडणुकीची मोर्चेबांधणी सुरु केली आहे. सध्या कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार भाजपचे निरंजन डावखरे हे आहेत. परंतु त्यांच्या जागी मनसेचा उमेदवार निवडून आण्यासाठी मुरुडमध्ये सभा संपन्न होताना दिसत आहेत.

मनसेची नुकतीच एक सभा राज ठाकरे यांच्या आदेशाने व मनसेचे रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मनसेचे रायगड जिल्ह्याचे उपाध्यक्ष शैलेश खोत यांच्या अध्यक्षतेखाली मुरुड शहरातील मध्यवर्ती कार्यालयात संपन्न झाली. सदरील सभेस मनसेचे तालुका अध्यक्ष महेंद्र शेडगे, मुरुड शहर अध्यक्ष जागन पुलेकर, मुरुड तालुका सचिव राजेश तरे आणि सर्व सेलचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मनसेचे रायगड जिल्ह्याचे उपाध्यक्ष शैलेश खोत यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

यादव बैकर यांचे निधन

। नागोठणे । वार्ताहर ।

वरवठणे गावातील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते यादव महादेव बैकर यांचे रविवारी (दि.२५) रात्री ११-३० वाजता अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर वरवठणे येथील अंबा नदीकाठच्या वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी नागोठणे विभागातील विविध क्षेत्रातील मान्यवर, बैकर यांचे नातेवाईक व वरवठणे गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत यादव बैकर यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले, दोन विवाहित मुली, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे.

पशुसंवर्धन विभागाकडून अर्ज करण्याचे आवाहन

। नेरळ । वार्ताहर ।

पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून शेतकरी वर्गासाठी आणि सुशिक्षित बेरोजगार यांच्यासाठी वैयत्तिक लाभाच्या विविध योजना ग्रामीण भागातील पशुपालक, शेतकरी बांधवांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या योजना अंतर्गत प्रक्रिया अधिक पारदर्शक करणेसाठी राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेमध्ये गेली चार वर्ष ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविले आहेत.

यामध्ये शासनाने एखाद्या योजनेकरिता अर्ज केल्यानंतर त्यास दरवर्षी पुन्हा अर्ज करावे लागू नये यासाठी तयार केलेली प्रतिक्षायादी सन २०२१-२२ पासून पुढील पाच वर्षापर्यंत सन २०२५-२६ लागू ठेवण्याची सोय केली आहे.

पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे त्याची निवड करण्यची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील पशुपालक, शेतकरी बांधव, सुशिक्षीत बेरोजगार युवक,युवती व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत आहे.

स्वच्छ सुंदर स्वस्थ नेरळसाठी एक पाऊल पुढे

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ ग्रामपंचायतीच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविला जात असून या प्रकल्पाची जनजागृती मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्यासाठी या प्रकल्पाची माहिती देण्यासाठी आणि प्रकल्प राबविण्यासाठी नेरळ ग्रामपंचायत मधील जेष्ठ नागरिक आणि विविध थरातील व्यक्तींकडून सल्ले मागण्याचे काम सुरु केले आहे. दरम्यान,नेरळ गाव आणि ग्रामपंचायत स्वच्छ, सुंदर आणि स्वस्थ करण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येणार असून सर्वांचा सहभाग घेतला जाणार आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या नेरळ ममदापुर विकास प्राधिकरणाकडून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून हा प्रकल्प लाह ग्रीन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून राबविला जात आहे. याबाबत जनजागृती करण्यासाठी नेरळ ग्रामपंचायत कार्यालयात नेरळ गावातील विविध थरातील समाजातील व्यक्तींचे सल्ले ऐकून घेण्यासाठी बैठका आयोजित केल्या होत्या.त्यावेळी स्थानिक पत्रकार, त्यानंतर नेरळ गावातील रायगड जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक तसेच अन्य शाळा यांच्यासह नेरळमधील डॉक्टर यांच्या बैठक आयोजित केल्या होत्या. या सर्व बैठकांना नेरळ ग्रामपंचायतीच्या सरपंच उषा पारधी, उपसरपंच मंगेश म्हसकर, ग्रामपंचायत सदस्य धर्मानंद गायकवाड, संतोष शिंगाडे, गीतांजली देशमुख, शिवाली पोतदार, श्रद्धा कराळे, उमा खडे, माजी सदस्य केतन पोतदार आदींसह लाह ग्रीन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे समन्वयक उपस्थित होते. घनकचरा व्यवस्थापन, जैवविघटनशील घटक, पुनर्वापर योग्य की अयोग्य याबाबत जनजागृती करण्याचे काम नेरळ ग्रामपंचायतीने हाती घेतले

आहे. त्याचवेळी ओला कचरा, सुका कचरा, घरगुती धोकादायक कचरा आणि ई कचरा याबद्दल मार्गदर्शन बैठकांमध्ये करण्यात आले. या प्रकल्पाच्या जनजागृतीमध्ये महत्वाची भूमिका असलेल्या आरोग्य विभागातील खासगी सेवा बजावणारे डॉक्टर यांनी सहभाग घेतला. त्यात डॉ. श्रीकांत डहाके, डॉ. शेवाळे, डॉ. साळुंखे, डॉ. राठोड, डॉ. सरोदे, डॉ. कर्वे, डॉ. चौधरी, डॉ. खान आदींनी सहभागी होत चर्चा केली. त्यावेळी नेरळ ग्रामपंचायती कडून सर्व दवाखाने यांच्यामधून निघणारे मेडिकल वेस्ट हे त्यांनी कोणत्याही कचराकुंडीत अथवा घंटागाडीमध्ये टाकायचे नाही अशी सूचना केली. त्याचवेळी हे मेडिकल वेस्ट त्यांना शासनाने दिलेल्या नियमाप्रमाणे दिले जावे अशी मागणी ग्रामपंचायतने केली. तर नेरळ ग्रामपंचायतीमधील जिल्हा परिषद शाळा आणि खासगी शाळा त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीला नेरळ मधील विद्या विकास शाळेच्या मुख्याध्यापिका निकम,एलएईएस शाळेचे प्रतिनिधी तसेच नेरळ मधील कन्याशाळेचे मुख्याध्यापक थोरवे, आनंदवाडी शाळेचे मुख्याध्यापक राठोड, जुम्मापट्टी शाळेच्या मुख्याध्यापिका गीता पाटील यांच्यासह शिक्षक वर्ग उपस्थित होता.

रामधरणेश्वर डोंगराला वणवा

। सोगाव । वार्ताहर ।

जिल्ह्यात पावसाळा संपल्यानंतर पुन्हा एकदा वणवे लागायला सुरुवात झाली आहे. सोमवारी दुपारच्या सुमारास अलिबाग तालुक्यातील रामधरणेश्वर डोंगरावर आग लागल्याची माहिती मापगांव ग्रामपंचायतीचे चंद्रकांत खोत यांना समजताच त्यांनी ही आग लागल्याची माहिती मुनवली येथील पर्यावरणप्रेमी सचिन घाडी यांना दिली. त्यांनी ही माहिती वनविभागाचे वनकर्मचारी प्रभाकर भोईर यांना दिली असता भोईर यांनी वेळ न दवडता आपले वनकर्मचारी नागेश काष्टे, मंगेश धोंगडे, सुमित पाटील, प्रसाद मानकुळे यांना सोबत घेऊन वणवा ठिकाणी आग विझविण्यासाठी गेले. वनकर्मचारी येईपर्यंत मात्र आगीने रौद्ररूप धारण करून वनसंपत्तीचे व वनौषधी वनस्पतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

अशा राष्ट्रीय संपत्तीला आग लावणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

नागरिकांची बूस्टर डोसकडे पाठ

। चिपळूण । वार्ताहर ।

कोरोना संसर्गाच्या नवीन व्हेरिअंटने दस्तक दिल्यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. कोरोना वेशीवर आला असतानाही तालुक्यातील नागरिकांनी बुस्टर (प्रिकॉशन) डोसकडे पाठ फिरवल्याचे चित्र आहे. तालुक्यातील केवळ २० हजार १८१ लोकांनी बुस्टर डोस घेतला आहे. पहिला डोस घेतलेल्यांपैकी ३३ हजार ४६२ नागरिकांना दुसरा डोस घेतलेला नाही. त्यामुळे कोरोनापासून बचावासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या लसीकरणाकडे शहरातील नागरिकांनी पाठ फिरवली आहे.

कोरोना संसर्ग रोखण्यासाठी लसीकरण हाच एकमेव उपाय असल्यामुळे शासकीय व प्रशासकीय यंत्रणांनी लसीकरणावर जोर दिला होता. कोरोना संसर्गाचा धोका होता तोपर्यंत नागरिकांकडून लसीकरणाला चांगला प्रतिसाद मिळत होता. रामपूर, कापरे, खरवते, दादर, शिरगाव, अडरे, सावर्डे, फुरूस, वहाळ आणि चिपळूण शहर येथे लसीकरण केंद्रावर पहाटेपासून रांगा लागत होत्या. परंतु काही महिन्यांपासून कोरोनाचा धोका कमी झाला. शासनाने देखील सर्व निर्बंध उठवले, त्यामुळे नागरिकांना मोकळीक मिळाली आणि लसीकरणाचा विषय मागे पाडला.

गेल्या काही दिवसापासून चीनसह काही देशांमध्ये कोरोना रुग्णसंख्येत वाढ होत आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. लसीकरणासह त्रिसुत्रीचा अवलंब करण्याच्या सूचना केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातून लसीकरणाबाबत माहिती घेतली असता बुस्टर डोसकडे नागरिकांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले. कोरोनाच्या बदलणाऱ्या रुपाचा सामना करण्यासाठी बुस्टर डोस प्रभावी ठरेल असे मानले जात आहे. ज्या नागरिकांनी लसीचा पहिला आणि दुसरा डोस घेतला आहे त्या नागरिकांना बुस्टर डोस दिला जात आहे.

वन्यप्राणी मित्रांना पाचारण

। रसायनी । वार्ताहर ।

ग्रामपंचायत हद्दीतील ब्राह्मणआळी परिसरात वानरांनी धुमाकूळ घातल्याने तेथील रहिवाशी त्रस्त झाले होते. येथील वानरांनी एकप्रकारे दहशतच निर्माण केल्याने ज्येष्ठ नागरिक, महिलांना व शाळकरी विद्यार्थ्यांना नाहक त्रासले होते. विद्यार्थ्यांना शाळेत जाताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता. ब्राम्हण आळी परिसरातून प्रवास करत असताना नागरिक हातात काठी घेऊनच घराबाहेर पडत असल्याचे चित्र पहावयास मिळत होते.

सदर बाब तेथील ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र कुंभार यांना सांगून सदर वानरांचा बंदोबस्त करावा, अशी विनंती केली होती. यावर तुपगांव ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर, तसेच ग्रामपंचायत सदस्य सचिन साखरे, स्वाती जाधव ग्रामपंचायत सदस्य यांनी त्वरित एका खाजगी पुनर्वसन अशा नावाच्या संस्थेला व वन्य प्राणी मित्रांना पाचारण करून सदर वानरांना पकडून सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्याचे काम सुरू केले आहे. ग्रामपंचायत सरपंच रविंद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भाळेकर व सदस्यांचे रहिवासी ग्रामस्थांनी आभार मानून समाधान व्यक्त केले.

खराब हवामानाचा बागायतदारांना फटका

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

लहरी व खराब हवामानामुळे बागायतदारांना खूप मोठ्या प्रमाणावर फटका बसण्याची शक्यता आहे. कारण नारळ व सुपारीच्या उत्पन्नामध्ये यावर्षी देखील मोठ्या प्रमाणावरती लक्षणीय घट होत असल्याचे पाहायला मिळत आहे. ३ जून २०२० रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळाने हरिहरेश्वर व श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील नारळ व सुपारीच्या वाड्या अक्षरशः झोपवून टाकल्या होत्या. नारळ व सुपारी ची ७० टक्के झाडे अर्ध्या वरून मोडून पडली तर काही बुंध्यातून उन्मळून पडली. त्यामुळे उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाली होती. परंतु यावर्षी अति पडलेला पाऊस, त्याचप्रमाणे थंडी पडायला लागल्यानंतर देखील वातावरणात होत असलेले बदल यामुळे नारळ व सुपारीच्या फुलांना गळती लागल्याचे पाहायला मिळत आहे. चार दिवस कडाक्याची थंडी पडते तर आठ ते दहा दिवस उष्मा जाणवतो. यामुळे झाडांना आलेल्या नवीन फुलांना बुरशी सदृश्य रोग होऊन फुले गळून पडतात. तसेच खारकुंड्या व इतर पक्षी देखील नवीन आलेल्या फुलांचा खूप मोठ्या प्रमाणावरती नाश करतात.

त्यामुळे देखील उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणावरती घट होत असते. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सुपारीची रोपे मोफत दिली असली तरी सदरची रोपे मोठी होऊन त्याला फळे येण्यासाठी कमीत कमी सात ते आठ वर्षाचा कालावधी लागतो. तसेच नारळाची नवीन रोपे लावल्यानंतर सुद्धा त्याला फळे येण्यासाठी आठ ते नऊ वर्षाचा कालावधी लागत असल्याने श्रीवर्धन हरीहरेश्वर परिसरातील बागायतदार पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडलेला पाहायला मिळत आहे. वादळानंतर शासनाने दिलेली नुकसान भरपाई अत्यल्प स्वरूपाची असल्याने बागायतदारांचे कधीही न भरून येणारे नुकसान झालेले आहे. त्यातच यावर्षी लहरी व खराब हवामानामुळे देखील शेतकऱ्यांना किती उत्पन्न हातात येईल? याबाबत चिंता लागून राहिलेली आहे.

ट्रेलर पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

। उरण । वार्ताहर ।

गव्हाण फाटा-दिघोडे मार्गावर रस्त्यावर दोन्ही बाजूला पार्किंग करून ठेवलेल्या वाहनांमुळे आणि बेशिस्त वाहन चालकांमुळे सततची होणाऱ्या वाहतूक कोंडीतून प्रवाशी नागरिकांची सुटका करण्यासाठी सकाळ आणि संध्याकाळ अवजड वाहतूक बंद ठेवण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

गव्हाण फाटा दिघोडे मार्गावरील वाहतूक कोंडी सुरळीत व्हावी या मार्गावरील प्रवास करणाऱ्या नागरिकांना

त्रास होऊ नये या दृष्टिकोनातून सार्वजनिक बांधकाम खात्याने काही वर्षांपूर्वी गव्हाण फाटा, दिघोडे मार्ग चार गाड्या पास होतील असे बारा मीटर रुंदीचे सिमेंटचे रस्ते बनविले आहेत. दास्तान ते दिघोडे मार्गावर छोट्याशा रस्त्यावर सकाळ संध्याकाळच्या वेळेस छोट्या वाहनास जाण्यास रस्ताच मिळत नाही त्यामुळे वाहतूक कोंडीमध्ये विद्यार्थी नोकरवर्ग प्रवाशी, रिक्षा चालक तासनतास अडकून राहतात. या सततच्या वाहतूक कोंडीचा त्रास नाहक त्यांना सहन करावा लागत आहे. या वाहतूक कोंडीतून उरणकरांची सुटका करण्यासाठी उरणचे युवक एकत्र येत आंदोलन केले होते. परिणामतः आजच्या घडीला या वाहतूक कोंडीला नियंत्रणात आणण्यासाठी प्रवाशी नागरिकांना याच्यातून मुक्त करण्यासाठी सकाळी ८ ते ११ आणि सायंकाळी ५ ते ८ अशी अवजड वाहतूक बंद ठेवण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

वाहतूक कोंडी हटवण्यासाठी कारवाई

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

शहरामध्ये मागील काही दिवसांपासून वाहतुकीची समस्या अत्यंत जटील होऊन बसली होती. शहरामध्ये एकदा जर का वाहतूक कोंडी झाली तर ती सुटण्यासाठी एक ते दीड तासाचा कालावधी सुद्धा लागत होता. पर्यटकांसोबतच सहलीच्या बस गाड्या देखील खूप मोठ्या प्रमाणात होत्या. त्यामुळे श्रीवर्धन मधील अरुंद रस्त्यांवरती वाहतूक कोंडी वारंवार होत होती. तसेच श्रीवर्धन बाजारपेठेत बेशिस्तपणे आपल्या दुचाकी उभे करणारे दुचाकीस्वार तसेच अनेक भाजी विक्रेते व दुकानदार आपल्या दुकानासमोर प्लॅस्टिकचे क्रेट मांडून त्यावरती भाजी विक्री करिता ठेवून रस्त्याची दोन ते तीन फूट जागा अडवत होते.

नगरपरिषदेची कारवाई झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी दुकानदार, भाजी विक्रेते नेहमीप्रमाणे आपली भाजी रस्त्यावरतीच मांडत होते. सहलीच्या ५० ते ६० बस गाड्या गावामध्ये येत असतात. तसेच पर्यटकांच्या चार चाकी गाड्या देखील हजारोच्या संख्येने येत असतात. शहरातील अरुंद रस्ते ही मुख्य समस्या असल्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होतच असते. मात्र श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी स्वतः वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी धडक मोहीम हाती घेतली आहे. पोलीस जीपमध्ये स्वतः माईक हातामध्ये घेऊन पोलीस निरीक्षक पाटील हे दुचाकी स्वारांना, त्याचप्रमाणे ज्या दुकानदारांनी व भाजी विक्रेत्यांनी आपला माल रस्त्यावर लावला आहे. त्यांना तो त्वरित हटविण्याच्या सूचना देत आहेत.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे.

या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक

उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क-
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

नियम धाब्यावर बसवून विद्यार्थी वाहतूक सुरू

परिवहन कार्यालयाच्या निरीक्षकांचे दुर्लक्ष; पालकांमधून चिंता व्यक्त; कारवाईची मागणी

। महाड । प्रतिनिधी ।

शाळेतील विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसला विविध ठिकाणी अपघाताच्या घटना घडल्यानंतर महाराष्ट्रात सर्वत्र विद्यार्थ्यांच्या वाहनांना कडक नियमावली घालून देण्यात आली. मात्र ही नियमावली कागदावरच अधिक प्रभावीपणे दिसून येत असून नियम धाब्यावर बसवून आजही खुलेआम विद्यार्थांची वाहतुक सुरूच आहे. याला प्रशासनाबरोबर मुलांचे पालकही तितकेच जबाबदार आहेत. महाराष्ट्र परिवहन विभाग कार्यालयाकडून नेमण्यात आलेले निरीक्षकांचे

देखील याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याने या अपघातामध्ये वाढ होत आहे.

राज्यात सर्वत्र स्कूलबस नियमावली बनवण्यात आली असली तरी मुलांच्या सुरक्षेबाबत प्रशासन आणि पालक देखील गांभीऱ्याने घेत नसल्याचे दिसून येते. अनेक सुशिक्षीत पालक देखील आपल्या कोवळ्या जिवांना कोंबूनच रिक्षा अगर मॅक्झीमो सारख्या छोट्या गाड्यांमधूनच प्रवास करावयास लावत असल्याचे चित्र शहरात रोज पहाटे पहावयास मिळत आहे. पहाटे उठून शाळेचा रस्ता धरणाऱ्या छोट्या छोट्या विद्यार्थ्यांना अनेक भंगार स्कूल बसमधूनच प्रवास करावा लागत आहे. आधीच खराब असलेल्या या रस्त्यांवर भल्याभल्यांचे कंबरडे मोडते तिथे छोट्या मुलांचे काय असा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे. तरी देखील पालक आपल्या मुलांना अशा गाड्यांमधून प्रवास करावयास भाग पडतात हे वास्तव आहे. महाराष्ट्रात अनेक वेळा स्कूल बसना अपघात झाल्याच्या घटना घडल्यानंतर स्कूलबस नियमावली कडक केली खरी पण ही नियमावली कागदारच राहिली आहे.

महाडसारख्या ठिकाणी देखील स्कूलबसना अपघात झाल्याच्या किरकोळ घटना घडून देखील याकडे गांभीर्याने घेतलेले नाही. शहरात बहुतांश शाळांमध्ये स्कूल बसेस सेवा लागू आहे. अनेक शाळांमध्ये पिवळ्या रंगाच्या खाजगी बसेस आहेत मात्र या बसेस म्हणजे जुन्याच गाडयांना नवीन मेकअप केल्याचा प्रकार आहे. तर अनेक शाळांमध्ये मॅक्झीमो, टाटा मिनीबस, जिप अशा वाहनांना काचेवर स्कूलबसचा स्टीकर लावून व्यवसाय केला जात आहे. या गाड्यांमधून मेंढर कोंबून नेल्याप्रमाणे मुलांना भरले जाते आणि वाहतूक केली जात आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहेच परंतू पालक देखील याकडे कानाडोळा करून आहेत. शाळा देखील आता पालकांची जबाबदारी लिहून घेत आपले हात वर करत आहेत.

पालकांची उदासिनता

आपल्या पाल्याला शाळेत पाठवण्यासाठी शाळा वापरत असलेली बस योग्य आहे का याची साधी विचारणा देखील केली जात नाही. शाळेत प्रवेश घेण्यापूर्वीच अनेक शाळा बसेसचे शुल्क वसूल करतात. अनेक पालक रिक्षा, छोटया बस, अशा विविध मार्गाने आपल्या पाल्याला शाळेत पाठवतात. याकरीता चांगले पैसेही मोजतात मात्र मुलांना कशा प्रकारे गाड्यांतून कोंबले जाते. याबाबत साधा जाब देखील पालक विचारताना दिसून येत नाही. यारून पालक आपल्या पाल्याबाबत किती जागरूक आहेत हे दिसून येते. एखादा अपघात झाल्यानंतर मात्र हेच पालक प्रशासनावर आगपाखड करताना दिसतात.

म ह त्त्वा चे

रस्ता दुरूस्तीची मागणी

पनवेल : तालुक्यातील वळवली खालचा तलावाचे तसेच कळंबोली रेल्वे स्टेशनकडे जाणारा रस्ता तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी शिवसेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगरपालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी कैलास गावडे, विश्वास पेटकर, प्रवीण पाटील, अशोक पाटील, बळीराम पाटील आदींनी निवेदन दिले.

सोनसाखळीची चोरी

पनवेल : पायी जात असलेल्या एका महिलेस मोटारसायकलवरून आलेल्या दोघांपैकी एका इसमाने त्यांना धक्का मारून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून पसार झाल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे. कळंबोली येथील करावली चौकात हेलन नाडार या पायी जात असताना दुचाकीस्वाराने त्यांना धक्का मारला त्यानंतर दुचाकीवरील एकाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची सोनसाखळी हिसकावून ते पसार झाले.

रेल्वे स्टेशन परिसरात मृतदेह

पनवेल : पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातील लोकल लाईनचे समोरील मोकळ्या जागेत कट्टयाचे बाजूस अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस तिच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. सदर महिलेचे अंदाजे वय ४२ वर्षे असून तिची उंची ४ फूट ८ इंच, अंगाने सडपातळ, रंग काळीसावळी, या महिलेबाबत माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे ०२२-२७४६७१२२ किंवा पोलीस निरीक्षक प्रकाश होवाळ यांच्याशी संपर्क साधावा.

'सुप्त गुणांना ओळखून आयुष्य घडवा'

। पनवेल । प्रतिनिधी ।

युवकांना आयुष्यात अनेक संधी चालून येत असतात, अशावेळेस आपल्यातील सुप्तगुणांना ओळखून आयुष्य घडवा, असे मार्गदर्शन कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ यांनी पनवेल येथे मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी केले.

पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा व महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातर्फे आयोजित 'आयुष्याच्या सुवर्णसंधी' व्याख्यान कार्यक्रमाच्यावेळी डॉ. प्रदीप ढवळ बोलत होते.

या समारंभास कोकण साहित्य परिषदेचे जनसंपर्क प्रमुख प्रा. एल. बी. पाटील, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे गणेश कोळी, प्रा.चंद्रकांत मढवी, जोत्स्ना राजपूत, स्मिता गांधी, गणेश म्हात्रे, रामदास गायधने, विकास पुंडले, जनार्दन सताने, भरारी फाऊंडेशनच्या संगीता थोरात, सुनिता खिल्लारे आदी उपस्थित होते. पाटील यांनी यावेळी, तरूणांनी देश, आई-वडील यावर प्रेम केले

पाहिजे. एका घराच्या प्रत्येक कोपर्यामध्ये सारे धर्म एकत्र रहात आहेत, हे घर एकत्र ठेऊ या.

मानवता धर्म ज्याला खर्या अर्थाने कळला तो जगण्यास लायक आहे असे शेवटी त्यांनी सांगून प्रेम कविता सादर केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी, महाविद्यालयातील तरुणांना आपल्या जीवनान अनेक संधी येत असतात. अशा संधीचे आपण सोने केले पाहिजे, तरच आयुष्यात तुम्ही उत्तम नागरिक बनू शकाल असे सांगितले. कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या विविध कार्यक्रम उपक्रमांचा आढावा घेतला. त्यांनी अशा कार्यक्रमातून नवोदित साहित्यिक घडविले जात असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रवीण गायकर यांनी केले. त्यांनी महाविद्यालयाची माहिती सविस्तरपणे सांगतानाच कार्यक्रमाची रूपरेषा ठळकपणे मांडली. उपस्थितांचे आभार डॉ. सोनू लांडे यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर व प्रा. शरयू नाईक यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावठी दारू जप्त

पनवेल : पनवेल परिसरातून गावठी दारूसह देशी दारूचा साठा पनवेल शहर पोलिसांनी हस्तगत करत त्यांच्या विरोधात कारवाई केली आहे. कुडावे येथील किराणा मालाच्या दुकानात बेकायदेशीररित्या देशी दारूचा साठा करून त्याची विक्री केली जात असल्याची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून ९८० रुपये किमतीच्या १८ बाटल्या हस्तगत केला. तर दुसऱ्या घटनेत सोमाटणे कातकरवाडी येथून एका इसमाकडून १० लिटर गावठी दारूचा साठा ज्याची किंमत १ हजार २०० रुपये इतकी आहे तो सुद्धा हस्तगत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे करंजाडे येथे किराणा मालाच्या दुकानात छापा टाकून ८३० रुपये किमतीच्या १८ बाटल्या हस्तगत केल्या आहेत.

जनता विद्यालयात रंगमंचाचे उद्घाटन

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर तालुका शिक्षण मंडाळाच्या कार्यकारिणीचे पुढाकार घेत अद्यावत उज्वल रंगमंचाचे उद्घाटन बुधवारी खोपोली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक हरेश कळसेकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, केटीएस मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, किशोर पाटील, राजू अभाणी, राजू ठक्कर, अनंता हाडप, अबू जळगावकर, दिलीप पोरवाल, नरेंद्र शहा, चंद्रकांत केदारी, भास्कर लांडगे, जयंत पाठक, शांताराम पाटील, दिशा राणे आदि उपस्थित होते

नव्याने उभारलेल्या उज्वल रंगमंचावर जनता विद्यालयाचे अध्यक्ष दिनेश गुरव यांनी दिग्दर्शन केलेला इंथुसिया जल्लोष-२०२२ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण एकापेक्षा एक डान्सची विजेता सोनाली पवार यांच्या लावणी आकर्षण ठरली आहे. याप्रसंगी रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अर्थसभापती चित्रा पाटील, खालापूरच्या माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, सुरेखा गुरव उपस्थित होत्या.

मिनल माळी यांना राज्यस्तरीय आगरी काव्य पुरस्कार

। चिरनेर । वार्ताहर ।

ग्रामीण साहित्यात रमलेल्या आणि अस्सल ग्रामीण जीवनाची अनुभूती घेतलेल्या तालुक्यातील चिर्ले येथील कवयित्री मिनल माळी यांनी टिपलीचा पानी व पुष्पवाटिका हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित करून त्यांनी ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी यथार्थ दर्शन घडविले. या त्यांच्या काव्य कौशल्याचा विचार करून त्यांना कोपरखैरणे येथील ज्ञान विकास महाविद्यालयाच्या प्रांगणात, आगरी साहित्य विकास मंडळाच्या वतीने २५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या १९ व्या आगरी साहित्य संमेलनात संमेलन त्याना राज्यस्तरीय गुणगौरव आगरी काव्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सोबत दहा हजार रुपयांची रोख रक्कमही देण्यात आली होती. त्यांना मिळालेली ही दहा हजार रुपयांची रोख रक्कम त्यांनी चिरनेर येथील आदिवासी आश्रम शाळेला देऊ केली आहे. यावेळी नारायण गावंड, पी.सी. पाटील, दशरथ पाटील, अरुण म्हात्रे, डी.डी.घरत, प्रसाद पाटील, रवी पाटील, चंद्रकांत पाटील, मोहन भोईर, पुंडलिक म्हात्रे, चंद्रकांत मढवी, रामनाथ म्हात्रे, दशरथ भगत आदी मान्यवर उपस्थित होते.

खालापूर पोलिसांतर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

। खालापूर । प्रतिनिधी ।

के.एस.सी उर्दू हायस्कूल हाल बुद्रुक ता.खालापूर जि.रायगड येथे इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थांना पोलीस निरीक्षक मा.सौ.सुवर्णा पत्की जिल्हा वाहतून शाखा रायगड यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून सपोनि.श्री.प्रशांत जाधव तसेच पोलीस हवालदार श्री.प्रदीप झेमसे जिल्हा वाहतूक शाखा यांच्यासह केंद्र सरकारच्या स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्रॅम अंतर्गत विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

यामध्ये विद्यार्थांना सपोनि प्रशांत जाधव यांनी देशभक्ती,

वाहतूक नियमांचे पालन, आपत्ती व्यवस्थापन, तसेच महिला सुरक्षा व भ्रष्टाचार निर्मुलन आणि वडील धाऱ्यांचा आदर करणे याविषयी व पोलीस हवालदार प्रदीप झेमसे यांनी रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमन व महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हेल्पलाईन नंबर यांची माहिती दिली.

तसेच आरोग्याच्या दृष्टीनिकोनातून आपले आरोग्य कसे टिकवावे याबाबत मार्गदर्शन करून कवायतीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

अवैध ढाब्यांवर कारवाई

पनवेल : पनवेल परिसरातील अवैध ढाब्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून धडक कारवाई करण्यात आली. यावेळी धाबा चालकांसह मद्य सेवन करणाऱ्या ग्राहकांकडूनही दंड आकारण्यात आल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिली.नविन वर्षाच्या पश्चाभूमीवर राज्य उत्पादन शुल्काचे रायगड जिल्हा अधीक्षक कीर्ती शेडगे, उपअधीक्षक विश्वजित देशमुख यांचे निर्देशानुसार संपूर्ण रायगड जिल्यात अवैध ढाबे, फार्म हाऊस, हॉटेल्स, रिसॉर्ट तसेच अवैध धंद्याविरोधात कारवाई करण्यात येत आहे.

या कारवाई अंतर्गत पनवेल ग्रामीण विभागातील दोन ढाब्यांवर कारवाई करण्यात आली आहे. या ढाब्यांवर दारूबंदी कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या ढाबेचालकांना प्रथमवर्ग न्यायालय पनवेल येथे हजर केले असता न्यायालयाने ढाबा चालकांना प्रत्येकी २५ हजार तर मध्यसेवन करणाऱ्या ग्राहकांना प्रत्येकी ५०० दंड सुनावला आहे. हि धडक कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक उत्तम आव्हाड, श्री पालवे, संभाजी चव्हाण व सचिन कदम यांच्या पथकाने केली.

वहाल येथे आरोग्य शिबीर

। चिरनेर । वार्ताहर ।

श्री साई नगर वहाल येथील साई मंदिर येथे सलीम शेख, रवींद्र राणा यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात डॉ. दीक्षित, सलीम शेख, सायराबानो शेख, बलराज झिरे, रवींद्र राणा अमोल शिरसाठ, अर्जुन कुराडे, आदींनी वजन, बीपी.शुगर, ऑक्सिजन तसेच कॅल्शिअम, दमा, खोकला, सांधेदुःखी, रक्तदाब मधुमेह, पित्त, पाचन संबंधी आजार, थॉयरॉईड, नेत्र विकार, मानसिक तणाव आदींची तपासणी केली.

रिटघर गावात रानगवा

पनवेल : पनवेल तालुक्यातील रिटघर गावात जंगलातील रानगवा आल्याने नागरिक भयभीत झाले. याबाबतची माहिती येथील पोलीस पाटील दीपक पाटील यांनी वन विभागाला दिली. गावामध्ये रानगवा

शिरल्याने या रानगव्याला पाहण्यासाठी नागरिकांची एकच गर्दी उडाली. मात्र हा रानगवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी धावत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. अखेर या रानगव्याला हुसकावून दुसऱ्या दिशेला पाठवण्यात आले.

जिल्हा पुरवठा विभागातर्फे पथनाट्यातून जनजागृती

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग समुद्र किनाऱ्यावर राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जिल्हा पुरवठा विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्यावतीने जागो ग्राहक, जागो या पथनाट्यातून ग्राहकांचे अधिकार व ग्राहक संरक्षण अधिनियम - २०१९ याविषयी जनजागृती करण्यात आली. यावेळी या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, ज्ञानदेव यादव, मानसी पाटील, तपस्वी नंदकुमार गोंधळी, विनायक सर्णेकर, नयन नाईक, हेमंत पाटील, दीपक मुळे, प्रेरणा पाटील, अनेश पाटील, गणेश पाटील, विजय नाईक, दिलीप शहापूरकर-अव्वल कारकून आदि उपस्थित होते. या पथनाट्यातून कलाकारांनी अलिबाग समुद्र किनाऱ्यावर व अलिबाग बस स्थानक येथे जनजागृती केली. पथनाट्यात प्रतिक कोळी, विराज म्हात्रे, साक्षी पाटील, नेहा म्हात्रे, सार्थक गायकवाड, वैष्णवी नागे आदी कलाकार सहभागी झाले होते. या कार्यक्रमास शेकडो नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन विनायक सर्णेकर यांनी केले होते.

आगरी साहित्य संमेलन संपन्न

। अलिबाग । वार्ताहर ।

आगरी साहित्य विकास मंडळातर्फे एक दिवसीय १९ वे राज्यस्तरीय आगरी साहित्य संमेलन रविवार (दि.२५) ज्ञान विकास हायस्कूल,कोपरखैरणे येथे संमेलन अध्यक्षा दमयंती भोईर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. प्रमुख अतिथी नारायण गावंड, माजी खा. जगन्नाथ पाटील,माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, पी.सी.पाटील, प्रा.अरुण म्हात्रे, दशरथ पाटील, प्रसाद पाटील, शिवराम पाटील, मयुरेश कोटकर, पुंडलिक म्हात्रे, डी.डी. घरत, जयश्री पाटील, हरिभाऊ घरत, दशरथ भगत, रवि पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहन भोईर यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.चंद्रकांत मढवी यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आगरी बंधू-भगिनींचा आगरी भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

ज्ञान विकास हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमास पी.सी. पाटील, मोहन भोईर, सुनील रानकर, प्रा.चंद्रकांत मढवी, प्राचार्य श्रीकांत पाटील यांनी सहभाग नोंदविला.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबागमध्ये ड्रायव्हर व सेल्समन पाहिजेत. अलिबागजवळील व्यक्तीस प्राधान्य. Mob No. 7447480000
- कंपनीमध्ये कामासाठी मुली आणि मुले पाहिजेत. प्रशिक्षण दिले जाईल. शिक्षणाची अट नाही. पगार ७५००, प्रति महिना, एक वर्षानंतर परमनंट केले जाईल. ठिकाण= बामणसुरे- चोंढी, मो.नं.= ९८२३५८५३२१
- चोंढी अलिबागमध्ये ब्युटी पार्लर कामासाठी मुले-मुली पाहिजेत. मो.९९२१०७३९६३
- कामासाठी जोडपे पाहिजे. कॉटेज व वाडी सांभाळण्यासाठी ओम कॉटेज, आक्षी, फोन नं. ८८३०८१९५२२

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

निसर्गरम्य ठिकाणांवर पोलिसांची नजर

। पनवेल । वार्ताहर ।

थर्टी फर्स्टसाठी जवळपासची सर्व हॉटेल बुक झाल्याने खारघर, तळोजा आणि परिसरातील गावांमध्ये थर्टीफस्ट साजरा करण्याकडे अनेकांचा कल आहे. त्यानुसार नियोजनही केले जात आहे. पण अशा ठिकाणांवर पोलिसांकडून वॉच ठेवण्यात येणार असून नव वर्ष स्वागताच्या उत्साहावर विरजण फिरण्याची शक्यता आहे.

निसर्गरम्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खारघर आणि ओवे

डोंगरावर डोंगरावर थर्टीफस्ट साजरा करण्याचा अनेकांनी बेत आखला आहे.

खारघरमध्ये अजित पॅलेस बार वगळता बार आणि मद्य विक्रीची दुकाने नाही. पनवेल, सीबीडी परिसरातील हॉटेल, बारमध्ये मद्यप्रेमींची वर्दळ तसेच खाद्य पदार्थांच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पैसे खर्च करूनही हॉटेलमध्ये मनासारखा आनंद लुटता येत नसल्यामुळे खारघर, तळोजा आणि परिसरातील काही हौशीमंडळी छुप्या मार्गाने निसर्गरम्य अशा खारघर आणि ओवे डोंगरावर डोंगरावर थर्टीफस्ट साजरा करण्याचे बेत आखत आहेत. त्यात गेल्या दोन दिवसापासून वातावरणात गारवा निर्माण झाल्याने हा उत्साह दुणावला आहे. पण या ठिकाणांवर जाणे कदाचित महागात पडण्याची शक्यता असून नव वर्ष स्वागताच्या वेळी पोलिसांकडून बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

विज्ञान प्रदर्शनातून समाज प्रबोधन

। तळा । वार्ताहर ।

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्राथमिक विद्यामंदिरात इयत्ता पहिली ते इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात बनवलेल्या प्रतिकृतीमधून समाज प्रबोधनाचा संदेश देत पालक वर्गाकडून व संस्था पदाधिकारी यांचेकडून कौतुकाची थाप मिळवलेली आहे. बाल विकास व प्राथमिक विद्यामंदिर तळेचे वस्तु प्रदर्शन व विज्ञान प्रदर्शन तसेच पालक मेळावा शनिवार (२४) संस्थेच्या संकुलनात आयोजित करण्यात आला होता. प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के यांच्या हस्ते तर विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रतिकृतीमधून समाजाला संदेश देण्याचे काम या लहान विद्यार्थ्यांनी केले. टाकाऊपासून टिकाऊ, पाणी जिरवा पाणी आडवा, प्रदूषण, वॉटर पंप, रेन वॉटर, उत्तम शेती यासारख्या ४३ प्रतिकृती मुलांनी बनवलेल्या. याप्रसंगी मारुती, श्रीराम कजबजे, डॉ. सतीश वडके, प्रकाश गायकवाड, निलेश पांढरकामे, समीर शिर्के, विनायक महाडकर, नेहा पांढरकाने, सचिन भाटे यांचे सह पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन भाटे, नितेश साबळे, मनीषा बांगर यांनी परिश्रम घेतले.

साळाव-रेवदंडा पूल बंद ठेवल्यास पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्या

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुंबईला जोडणारा व मुरुड पर्यटन स्थळास झळाळी देणारा प्रमुख साळाव -रेवदंडा पूल हा दुरुस्तीसाठी काढला असून दुरुस्ती होई पर्यंत सदरच्या पुलावरून वाहतूक हि बंद केली जाणार आहे. सदरचा पूल हा बॅरिस्टर ए.आर. अंतुले यांच्या कालावधीत बांधला गेला.आज या पुलास अनेक वर्ष झाली आहेत.लवकरच सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे या पुलाच्या दुरुस्तीसाठी सदरच्या पुलावरील वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. सदरच्या पुलावरील वाहतूक बंद केल्याने अनेक स्थानिक नागरिक व पर्यटक याना मुरुड येथे येण्यास अश्यक्य होणार आहे.यासाठीच सार्वजनिक बांधकाम खात्याने सर्वप्रथम लोकांना असणारी पर्यायी वाहतूक उपलब्ध करून द्यावी मगच पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरु करावे अशी मागणी महाराष्ट्र नव निर्माण सेनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष शैलेश खोत व मनसेचे मुरुड तालुका सचिव राजेश तरे यांनी याबाबत लेखी निवेदन कार्यकारी अभियंता अलिबाग याना दिलेल्या निवेदनात आपली व्यथा मांडली आहे.

या निवेदनात रेवदंडा खाडी वरील कुंडलिका नदीवरील पूल हा दुरुस्तीसाठी अनियमित कालावधी पर्यंत बंद करीत असताना पर्यायी वाहतूक हि जलमार्ग हा एकमेव पर्याय राहणार आहे.यासाठी सर्वप्रथम सार्वजनिक बांधकाम खात्याने जंगल जेट्टीची सुविधा प्रवासी वर्गास मोफत उपलब्ध करून द्यावी कारण येथे शिक्षण घेणारे विद्यार्थी, मासे विक्रेते,व्यापारी,रुग्णवाहिका,व असंख्य नोकरदार वर्ग आहे.यांची सर्वप्रथम सुविधा करा मगच पूल दुरुस्तीसाठी काढण्यात यावा अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.सार्वजनिक बांधकाम खात्याने लोकांचा विचार न केल्यास मनसेला आंदोलन करण्याशिवाय पर्याय नसल्याचा इशारा सुद्धा देण्यात आला आहे.पूल दुरुस्तीसाठी टेंडर सुद्धा काढण्यात आल्याचे विश्वसनीय कळत आहे.

तेजस डाकीकडून मदतीचा हात

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील बोरखार गावातील तेजस डाकी यांनी गावातील नागरिकांसाठी एक हात मदतीचा या संकल्पनेतून, त्यांनी गावात आदर्श निर्माण केला आहे. यात प्रामुख्याने मुलींच्या लग्न सोहळ्यासाठी २५ हजार रुपये तर गावात कन्यारत्न जन्माला आल्यास रोख पाच हजार रुपये आणि गावातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास अंत्यविधीसाठी दहा हजार रुपयांची आर्थिक मदत अनेक वर्षापासून करीत आहेत.

नाताळच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता संदेश

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

ख्रिसमस अर्थात नाताळ सणाच्या पार्श्वभूमीवर नवीन वस्तू खरेदीचा बाजारपेठांतील उत्साह लक्षात घेऊन या गर्दीमध्ये स्वच्छता संदेशाचा प्रसार होण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्षाच्या वतीने वाशी येथील इनॉर्बिट मॉल आणि सीवूड नेरूळ येथील ग्रँड सेंट्रल मॉलमध्ये ङ्गफ्लॅश मॉबफ ही अभिनव संकल्पना उत्साहाने राबविण्यात आली. या दोन्ही ठिकाणी मोठ्या संख्येने कुटुंबासह उपस्थित असलेल्या नागरिकांनी फ्लॅश मॉबमधील गीतनृत्यांना उत्तम प्रतिसाद देत यातील शंबरहून अधिक कालाकलाकारांसह निश्चय केला, नंबर पहिलाचा गजर केला.

यावर्षी स्वच्छ सर्वेक्षण २०२३ ला सामोरे जात असताना गतवर्षीचे देशातील तृतीय क्रमांकाचे मानांकन उंचाविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने जोरदार प्रयत्न सुरू केले असून विविध उपक्रम राबविण्यावर भर दिला जात आहे. याचाच एक भाग म्हणून फ्लॅश मॉबची संकल्पना राबविण्यात आली, ज्यामधील गीतनृत्यांना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात कौतुकाची दाद दिली. सर्वसाधारणपणे सणानिमित्ताने मॉलमधील वातावरण खरेदीच्या उत्साहाचे असताना अचानक सगळीकडून वाद्ये वाजू लागतात आणि लोकांना काही कळण्याच्या चारीदिशांनी शेकडो युवक-युवती मॉलच्या मधल्या मोठ्या जागेत एकत्र येतात आणि लोकप्रिय गाण्यांवर नाचू लागतात.

हे अचानक काय झाले हे बघण्यासाठी सगळे त्यांच्या आसपास दुतर्फा जमतात आणि उत्सुकतेने बघू लागता. त्यातील काही गाण्यांतून स्वच्छता संदेशाचे प्रसारण होते आणि नागरिकांच्या मनावर कचरा वर्गीकरणाचा तसेच स्वच्छतेचा संदेश बिंबविण्यासाठी फ्लॅश मॉबची अनोखी संकल्पना नवी मुंबई महानगरपालिकेने राबविली असल्याचे लोकांना कळते.मग लोकही स्वच्छतेविषयी जनजागृतीच्या या फ्लॅश मॉब उपक्रमात स्वयंस्फुर्तीने सहभागी होतात आणि स्वच्छतेचा एकच जागर केला जातो. वाशीमधील इनॉर्बिट मॉलमध्ये व सीवूड मधील ग्रँड सेंट्रल मॉलमध्ये सायंकाळी कोणतीही पूर्वकल्पना नसताना अचानक घडविलेल्या फ्लॅश मॉब या अभिनव उपक्रमामुळे स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत अनोख्या पध्दतीने पोहचविण्यात आला, ज्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

मुरुड तहसीलदार कार्यालयात मास्क वापरण्यास सुरुवात

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

राज्यात कोव्हिड-१९ चा वाढता प्रार्दुभाव लक्षात घेता, संभाव्य धोक्याच्या दृष्टीकोनातुन आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी स्वास्थ्य व परिवार कल्याण विभाग, मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून मार्गदर्शक सुचनेनुसार निवासी उप जिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांनी कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी रायगड जिल्ह्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयातील शाखांमधील अधिकारी तसेच कर्मचार्यांना मास्क सक्ती करण्यात आली होती त्याच अनुषंगाने आजपासून मुरूड तहसीलदार कार्यालयात मास्क वापरण्यास सुरुवात करण्यात आली आहे.कोव्हिडचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे.तसेच गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये असे आवाहन तहसीलदार-रोहन शिंदे यांनी केले.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालकयांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

खोपोली नगरपरिषद

KMC

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीनकोड नं. ४१० २०३
फोन नं. (०२१९२)२६२२२२, २६३३५६, २६४२११,

जा.क्र.के.एम.सी/मिळकत विभाग/३३२२ दिनांक :- २६/१२/२०२२

मिळकत विभाग

फेर ई-निविदा सूचना २०२२-२३

खोपोली नगरपरिषद मिळकत विभागाकडील ई-निविदा सुचना क्र.१ खोपोली शहरातील नगरपरिषद हद्दीतील मार्केट व परिसरातील दैनंदिन वसुली ठेकापद्धतीने करणे, इच्छुक ठेकेदाराकडून ब-१ नमुन्यातील द्विलिफाफा पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई-निविदा सूचना www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २८/१२/२०२२ सकाळी ११.00 नंतर उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

सही/-
मुख्याधिकारी
खोपोली नगरपरिषद

खो पो ली न ग र प रि ष द

MAHATRANSCO — SRM RE-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification:

Sr. No.	Tender/Notice No.	Particulars of Tender	Estimated Cost of Tender
1	**Tender No:** EE/EHV (O&M)/DN/MHD/RE-Tender-52/2022-23 Dt. 28.12.2022 **RFx No. 7000025689**	**Sub:** Invitation of SRM RE-Tender for the work of Stub strengthening of towers of various 220 kV / 100 kV EHV line S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn., Mahad for the year 2022-23	Up to Rs. 24,99,094/- (Including GST + 1% Labour Cess)

EMD will be 1% of the **Estimated Cost** or Rs. 5,000/- whichever is the higher
Tender Fee: Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
Bid Submission is From: 28.12.2022 @ 00:00 Hrs to 03.01.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
Note: All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer (I/c)
EHV (O&M) Dn., Mahad

कित्ते भंडारी हितवर्धक मंडळ अलिबाग

नोंदणी क्रमांक अ-५९४(के), स्थापना-६ जुलै १९५८
पत्ता- घर क्रमांक १९८० अ, अलिबाग रेवदंडा रस्ता, अलिबाग, जिल्हा रायगड ४०२२०१

निविदा सूचना

कित्ते भंडारी हितवर्धक मंडळ अलिबाग घर क्रमांक १९८० अ, अलिबाग रेवदंडा, अलिबाग, जि.रायगड ४०२२०१ यांना खाली साहित्य/मशिनरी पुरवणे करीता व खालील कामे करण्याकरीता/सेवा पुरवठा करण्यासाठी अनुभवी उत्पादक/विक्रेते/पुरवठादार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी व कंत्राटदार यांचेकडून निविदा देकार मागवित आहेः

१) संस्थेच्या जागेत ४ कमानी (आर सि सि बांधकाम व कपलातीसह (प्लास्टर) उभारणे व संरक्षक भिंत (वीट बांधकाम, ग्याल्वनाईज पाईप व लोखंडी सळ्यांची जाळी (ग्रील) चौकोनी बार पट्टीसह-दर मजुरीचा वेगळा व एकत्रित ठोक कंत्राट असा वेगळा नमूद करावा (कमानीचा आराखडा व तत्सम कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात सकाळी १०.३० ते १.३० व दुपारी २.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत अवलोकनार्थ उपलब्ध असतील)

२) संस्थेसाठी विविध कामाकरीता आवश्यकतेनुसार खालील माल व साहित्य पुरवठा करणे. (अ) सिमेंट (अल्ट्राटेक) प्रती पोते (ब) स्टील (टाटा)-प्रती किलो (क) रेती (गोडी/खारी) प्रती ब्रास वाहतुकीसह किंवा वाशटन रेती पुरविणे (दर पोते/प्रती किलो नमूद करणे) (ड) खडी (क्रमांक १ व २), ग्रीट व डबर, प्रती ब्रास वाहतुकीसह (इ) भरावासाठी माती पुरविणे प्रती ब्रास वाहतुकीसह व स्वामित्वासह

३) सरकते व स्थावर गेट बसविणे (एकूण ६) (तपशील संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध)

४) संस्थेच्या सभागृहास आतून एक हात रंगकाम करणे व संस्थेच्या इमारतीस जेथे आवश्यकता असेल तेथे दुरूस्ती करून रंग टच अप करणे दर मजुरीचा वेगळा व एकत्रित ठोक कंत्राट असा वेगळा नमूद करावा.

५) संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहामध्ये ध्वनी यंत्रणा बसविणे व आवश्यक त्या माईकचा पुरवठा करणे.

६)संस्थेच्या इमारतीचे नाव मध्यवर्ती ठिकाणी अक्र्यालिक मध्ये तयार करणे व एल इ डी सह पुरवठा करून बसविणे.

७) संरक्षक भिंतीवर व कमानीवर आवश्यक त्या ठिकाणी विद्युत दिवे बसविणे व त्या अनुषंगाने आवश्यक ती कामे पुरविणे.

८) संस्थेच्या इमारतीवर संस्थेचे नाव बोधचिन्हासह मध्ये तयार करणे व एल इ डी सह पुरवठा करून बसविणे.

९) संस्थेच्या सभागृहाच्या नावावर आवश्यक ती प्रकाश योजना करणे.

१०) संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहात आवश्यक त्या ठिकाणी सोनेरी रंगात कोरीव अक्षरात नावे टाकून आवश्यक त्या आकाराच्या ग्रॅनाईट पाट्या बनविणे.

११) संस्थेच्या माहितीविषयक लघू स्वरूपात माहितीपट/चित्रफित तयार करून देणे (पेन ड्राईव सह)

१२) संस्थेच्या उद्घाटन सोहळा व स्मरणिका प्रकाशन सोहळा व इतर कार्यक्रमासाठी छायाचित्रे काढणे व प्रिंट करून (पेन ड्राईव सह) देणे (दर आकारानुसार नमूद करावा)

१३) हिरक महोत्सवी स्मरणिका छपाई करून देणे-जाहिराती मजकूर व लेखांसह (अंदाजे रंगीत पाने १०० ते १२०, प्रती १०००) व सुमारे ३० मानपत्रांची छपाई करून देणे व १००० निमंत्रण पत्रिका छपाई करून देणे.

१४) संस्थेच्या उद्घाटन सोहळा व इतर समारंभासाठी निवेदन करण्यासाठी निवेदक/निवेदिका नेमणूक करणे (संबंधितानी मानधनासहित दर नमूद करावा)

१५) संस्थेच्या विविध कार्यक्रमासाठी आवश्यक त्या वेळी गणवेशधारी सक्षम ५ सुरक्षा रक्षक पुरविणे.

१६) संस्थेच्या आवारात विविध ठिकाणी नामांकित कंपन्याचे सिसिटीव्ही कॅमेरे (आवश्यक त्या साठवण प्रणालीसह) व विविध सामुग्री सह पुरविणे व बसविणे.

१७) संस्थेसाठी योग्य त्या तीन आकारामध्ये सन्मानचिन्ह (संस्थेच्या बोध चिन्हासह व नावासह) तयार करून पुरविणे (संख्या मोठी ३०, मध्यम ५० व लहान १५०)

१८) सभागृहामध्ये विविध समारंभासाठी आवश्यकतेप्रमाणे खुर्च्या पुरविणे, लग्नविधी व त्या अनुषंगाने करावयास लागणाऱ्या धार्मिक विधीसाठी आवश्यक असणारी भांडी व साहित्य पुरविणे, राजाराणी खुर्च्या, सोफा व अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी आवश्यकतेनुसार खुर्च्या पुरविणे (दर वाहतूक/ने-आण करणे व मजुरीसह नमूद करावे)

निविदेच्या अटी व शर्तीः

१)निविदा दर तांत्रिक बाबीसह तपशीलवार असावे.

२)निविदेबरोबर वस्तू व सेवाकर नोंदणी घेतली असल्यास त्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व माहे सप्टेंबर २०२२ कालावधीचे दाखल केलेले विवरण पत्र सादर करावे.

३) निविदेबरोबर कामाचा अनुभव अथवा अलिबाग शहरात व लगत जवळपास ज्या ग्राहकांना विक्री केली अथवा सेवा दिली असेल किंवा कंत्राट पूर्ण केले असेल तर त्याचा तपशील अशा ग्राहकांच्या संपूर्ण पत्यासह द्यावा.

४) निविदा/देकार व त्यातील दर सादर केल्यापासून ३ महिने वैध राहतील व त्यात कोणत्याही सबबीवर दरवाढ मिळणार नाही.

५) वरील सर्व कामाकरीता जर इमारतीचे व परिसराचे निरीक्षण करावयाचे अथवा इतर माहितीसाठी खालील व्यक्तींशी संपर्क करावा.
अ) श्री.बळवंत शिरसेकर भ्रमणध्वनी ९८२३६३८२२२ आ) श्री तोडणकर गुरूजी-भ्रमणध्वनी-८७९३८२१२९९ इ) श्री संतोष दामोदर मोरे-भ्रमणध्वनी-९२७१७१८५१९ ई) श्री मधुकर गोपाळ परकर-भ्रमणध्वनी-९२७०५८४५८८ उ) श्री.कमळाकर परशुराम पडवळ-भ्रमणध्वनी ८४११९५३४६५

६) काम क्रमांक १, ३, ४ व ७ हे संस्थेचे अधिकृत वास्तुविशारद श्री शशिकांत बाळकृष्ण मोहिते यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार करावे लागेल व तसेच श्री संतोष दामोदर मोरे यांच्या देखरेखीखाली करावे लागेल.

७) वरील निविदा व देकार दि.०८/०१/२०२३ पर्यंत खालील नावाने व खालील पत्त्यावर पाठवावे :
अध्यक्ष कित्ते भंडारी हितवर्धक मंडळ अलिबाग-घर क्रमांक १९८० अ, अलिबाग रेवदंडा रस्ता, अलिबाग, जिल्हा रायगड ४०२२०१

८)निविदा दि.१५/०१/२०२३ रोजी सायंकाळी ४.00 वाजता उघडण्यात येतील.

९)शासकीय नियमास अधीन राहून आवश्यक त्या कायद्यानुसार लागू असलेले आवश्यक ते करकपात केले जातील.

१०) निविदा स्वीकारणे व नाकारणे, संपूर्ण प्रक्रिया रद्द करणे याचा अधिकार संस्थेची व्यवस्थापक/ कार्यकारी समिती स्वतःकडे राखून ठेवत आहे. त्याबद्दल कोठेही दाद मागता येणार नाही.

दिनांक : २६/१२/२०२२

बळवंत यशवंत शिरसेकर
अध्यक्ष
कित्ते भंडारी हितवर्धक मंडळ अलिबाग

अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्र. /२०२२ दि.

अ. क्र.	अनुसूची	अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक	मालमत्तेचे ठिकाण	मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/ गाळा वगैरे	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याची नावे	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव
१	२	४३३/००५२०	ठिकरुळ नाक्याजवळ अलिबाग	तळमजला, अे विंग व्यापारी गाळा नं. १३	किशोर गुणाजी कासरुंग	सचिन गुणाजी कासरुंग
२	२	१०७७/०४७९६	पागाची गल्ली, अलिबाग	तिसरा मजला, ए विंग, निवासी सदनिका क्र. ३०१	मे मधुर एंटरप्रायझेस तर्फे भागीदार देवांग हरिदास ठक्कर	दिपा प्रकाश गोडबोले
३	२	८६४/०४४४३	भाजीमार्केट जवळ, अलिबाग	तिसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३०१	दर्शन जगदीश शाह	सुनील नरेश थळे
४	२	१४५२/०१७१७	मारुती नाक्या-जवळ, अलिबाग	पहिला मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. १०६	अनीस अहमद मुकरी	समीर सुरेश नाईक व प्रणाली समीर नाईक
५	२	७१०/००९९२	घरत आळी, अलिबाग	तळमजला, निवासी सदनिका क्र. ३	पी पी कन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रा. प्रविण रघुनाथ राऊत	काशिनाथ बाळकृष्ण मोहिते
६	३	२२४/००२९४	कोळीवाडा, अलिबाग	घर	जानू हाशा बारगीर	ज्ञानेश्वर यशवंत बारगीर
७	२	१०७७/०४८२०	पागाची गल्ली, अलिबाग	चौथामजला, बी विंग निवासी सदनिका क्र. ४०२	मे मधुर एंटरप्रायझेस तर्फे भागीदार देवांग हरिदास ठक्कर	पूजा पुरुषोत्तम तेली
८	२	५०३ ड/००६७१	मोहिते गल्ली, चेंढरे, अलिबाग	घर	जनु शिवलाल राईका व शिवलाल वालाजी राईका	सुनील पांडुरंग हरेर व मनिषा सुनील हरेर
९	२	१६१९ अ/०४७२०	ब्राह्मण आळी, अलिबाग	तिसरा मजला, ए विंग, निवासी सदनिका क्र. ३०१	रेखा अरुणकुमार चौधरी व अरुणकुमार निवास चौधरी	प्रिया सुनील जाधव व सुनील साहेबराव जाधव
१०	२	१४३४/०१७०३	कामत गल्ली, अलिबाग	अप्पर सेकंड मजला डी विंग, निवासी सदनिका क्र. १०	प्रविण रघुनाथ राऊत	राखी शशीधर राजाध्यक्ष
११	२	८३३/०३८०२	पागाची गल्ली, अलिबाग	तिसरा मजला, निवासी सदनिका क्र. १८	सुजाता सुरेश पाटील	सतीश मधुकर पेडणेकर
१२	२	१४४/०१७११	मारुती नाका, अलिबाग	दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०४	विजय दत्तात्रेय कळटे व विनिता विजय कळके	हेमंत काशिनाथ म्हात्रे व परिक्षा हेमंत म्हात्रे
१३	२	१०३०/०१३१८	मशिदीजवळ, बाजारपेठ अलिबाग	दुसरा मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. २०४	माधुरी बाळकृष्ण देवळेकर	अरुण शांताराम पाटील व अपर्णा अरुण पाटील
१४	२	१६१९ अ/०४६३२	ब्राह्मण आळी अलिबाग	दुसरा मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. २०२	मे सावित्री कन्स्ट्रक्शन तर्फे मुकेश बी जैन तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी सुभाष जैन	सतीश वसंत जोशी व श्वेता सतीश जोशी
१५	२	१३३६/०१६०२	एस.टी. स्टँड जवळ अलिबाग	पहिला मजला, ए विंग, निवासी सदनिका क्र. १०४	सुलभा अनंत कुंटे	वर्षा विनायक दातार
१६	२	१५०/०२७५४	श्रीबाग २, अलिबाग	दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३	कस्तूबेन वसंतीलाल शहा	ताराचंद वसंतीलाल शहा
१७	२	१६००/९/०४५५५	ब्राह्मण आळी अलिबाग	तिसरा मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. ३०१	मे रसिका कन्स्ट्रक्शनतर्फे भागीदार जयंत मधुकर वाखारकर तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी अंकिता प्रकाश माळगे	अभिर अनंत भोईर व रश्मी अभिर भोईर
१८	२	२०३२/०२५२८	रायवाडी चेंढरे, अलिबाग	दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०३	नरेश सखाराम घरत	मनेश मनोहर पाटील
१९	२	१४४६/०१७१४	मारुती नाक्या-जवळ, अलिबाग	दुसरामजला,निवासी सदनिका २०१	परेश बाळाराम खरवले	चारुदत्त बाळाराम खरवले
२०	२	१०७७/०४८११	महादेव आळी, अलिबाग	दुसरा मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. B- २०३	मधुर एंटरप्रायझेसतर्फे भागीदार देवांग हरिदास ठक्कर	अक्षय चंद्रकांत टोपले व प्रतिक्षा चंद्रकांत टोपले
२१	२	१०७३/	घरत आळी, अलिबाग	चौथा मजला, निवासी सदनिका क्र. B- ४०१	प्रशांत मधुसूदन नाईक तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी धनंजय अनंत दळवी	प्रणव जगन्नाथ म्हात्रे व पूर्वा प्रणय म्हात्रे

मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

माथेरान शून्य कचरा डेपोबाबत अभ्यासकांना उत्सुकता

कचरामुक्त डम्पिंग ग्राऊंड बनले प्रेक्षणीय ठिकाण

। नेरळ । संतोष पेरणे ।

माथेरान हे पर्यटकांचे आवडते पर्यटनस्थळ असून प्रदूषणमुक्त शहर म्हणून माथेरानकडे पाहिले जात होते. आता तर स्वच्छतेमध्ये नगरपरिषदेने एक पाऊल पुढे टाकले आहे. स्वच्छ सर्वेक्षण अभियान राबविताना २०२० मध्ये माथेरान हे डम्पिंगमुक्त शहर म्हणून घोषित झाले आहे. ५० वर्षाचा कचरा तेथून हटविण्यात आल्यानंतर माथेरान शून्य कचरा डेपो असलेले शहर बनले असून त्या शून्य कचरा डेपोची माहिती घेण्यासाठी अभ्यासक माथेरानला भेटी देत आहेत. त्याचवेळी आलेले पर्यटक देखील खास भेट देत असतात.

त्यामुळे पर्यटन स्थळांच्या यादीत शून्य कचरा डेपो हे आणखी एक पर्यटन स्थळ बनले आहे.

माथेरानला मोटर वाहनांना बंदी असल्यामुळे येथे सर्व कामे ही मनुष्यबळावर केली जातात. यामध्ये माथेरानची स्वच्छता ही मनुष्यबळावर केली जाते. संपूर्ण शहरातील कचरा एकत्र करून हातगाडी मार्फत डम्पिंग ग्राउंडमध्ये टाकला जायचा. त्याच वेळेस नगरपरिषदेतील तत्कालीन मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी डम्पिंग मुक्त माथेरान करण्याच्या हालचाली केल्या आणि त्यातून ओला कचरा आणि सुका कचरा याचे वर्गीकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. लोकांना याची सवय लागावी म्हणून सतत जनजागृती केली. डम्पिंग ग्राउंडवर पडलेले प्लास्टिक, काचेच्या बाटल्या इतर कचरा याचे वेगवेगळ्या ठिकाणी वर्गीकरण केले आणि येथील कचरा उचलून मिनीट्रेनमधून माथेरान बाहेर नेला. त्यामुळे डम्पिंग हा कचरामुक्त झाला.

कचरा उचलून झाल्यावर डम्पिंग ग्राउंडमध्ये औषधी झाडे लावून त्या परिसरात पर्यटकांसाठी प्रेक्षणीय स्थळ बनविण्यास हर्बल गार्डन चा दर्जा देण्याचा प्रयत्न पालिकेने सुरु केला आहे. परंतु पर्यटन स्थळांच्या ठिकाणी डंपिंग ग्राउंड हे प्रेक्षणीय स्थळ बनले आहे. त्या भागाचा अभ्यास करण्यासाठी देशभरातून अभ्यासक येत असतात. त्यावेळी ते अभ्यासक यांना माथेरान मध्ये पर्यटन देखील घडते. तर शिक्षण घेणारे पर्यटक देखील माथेरानमध्ये आल्यावर डम्पिंग ग्राउंडला भेटी देत असतात. तर माथेरानमध्ये कचरा मुक्तीचा ध्यास घेऊन काम केल्याबद्दल तात्कालिक मुख्याधिकारी रामदास कोकरे यांच्या नावाने मार्ग देखील बनविण्यात आला आहे. असे एखाद्या रस्त्याला एखाद्या अधिकाऱ्याचे नाव देण्यात उदाहरण अलौकिक असेच आहे. त्यात या शून्य कचरा डेपोमध्ये येऊन अभ्यास करणारे असंख्य अभ्यासक माथेरानमध्ये काहीसे येत आहेत.

महत्त्वाचे

कराटे स्पर्धेत अंजुमनला यश

। म्हसळा । वार्ताहर ।

पनवेल तालुका क्रीडा संकुल येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धेत चॅम्पियन्स कराटे क्लबतर्फे म्हसळा तालुक्यातून १४ खेळाडूंनी सहभाग घेत कराटे चॅम्पियन होण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. यापैकी अंजुमन हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज म्हसळाच्या चार विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले. त्यामध्ये रुमाना खान, शिया तांबे, विक्रांत खांडेकर, आयुष शिगवण, सहिल साळुंखे, धृपाल कुमार, घनसार फझल या विद्यार्थ्यांनी उज्वल यशसंपादन करून तालुक्याचे तसेच आपल्या विद्यालयाचे नाव उज्वल केले. यशस्वी विद्यार्थ्यांची पुढील स्पर्धेसाठी धारावी येथील स्व.राजीव गांधी स्टेडियम,धारावी येथे होणाऱ्या मुंबई विभागीय कराटे स्पर्धे करीता निवड झाली आहे.यशस्वी स्पर्धाकांचे नासिर मिठागरे, फझल हलडे, प्रा. महंमद तांबे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी अभिनंदन केले.

ध्रुमी पंदेरेला सुवर्ण पदक

। चिपळुण । वार्ताहर ।

मालाड पश्चिम येथील उत्कर्ष मंदिर शाळेचा क्रीडा महोत्सव नुकताच संपन्न झाला. यामध्ये इयत्ता तिसरीतून ध्रुमी गणेश पंदेरे हिने रिंग टाकण्यात प्रथम क्रमांक मिळविला. तसेच १०० मिटर धावण्यात द्वितीय क्रमांक मिळविला. सांघिक लंगडी सामन्यात विजय मिळविला. त्यात ध्रमी गणेश पंदेरे हिला दोन गोल्ड मेडल व एक सिल्व्हर मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

क्रिक्रेट सामन्यात मुठवली खु.अ विजेता

। खांब-रोहा । वार्ताहर ।

शिव छत्रपती असोसिएशन मुठवली खु.ब ता.रोहा यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या विभागीय क्रिक्रेट स्पर्धेत मुठवली खु.अ संघाने अंतिम सामन्यात सर्वोत्तम कामगिरी करून विजेतेपद पटकावले. तर स्पर्धेतील उपविजेतेपद जी.सी.सी.पिंगळसई या संघाने पटकावले. सोनगाव आणि पिंगळसई या संघांना अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेतील सामनावीर म्हणून शिवतेज शिंदे,उत्कृष्ट फलंदाज सुशांत शेटगे,उत्कृष्ट गोलंदाज-सनी जाधव तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षण अमृत सानप यांना महेश तुपकर, तुळशीराम शेळके, सतीश ठाकुर, मारुती तुपकर आदी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी मंगेश तुपकर, चंद्रकांत, अविनाश शेळके, महेश शेळके, अनिकेत शेळके, अनिकेत शेळके, शिंदे, शिवाजी शिंदे, दिनेश तुपकर, संदेश तुपकर, विशाल शिंदे, संजय तुपकर, विलास शेळके, वसंत शिंदे, प्रमोद ठमके, मुकेश शिंदे, रवींद्र शिंदे, नामदेव शिंदे, राकेश शेळके, संतोष भोसले, मंगेश शेळके, आकेश शेळके, नरेश तुपकर, परेश ठमके आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत विद्यार्थ्यांचा दबदबा

। कोलई । वार्ताहर ।

जिल्हास्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धा २२ डिसेंबर रोजी तालुका क्रीडा संकुल पनवेल या ठिकाणी घेण्यात आली होती. या स्पर्धेसाठी २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता तसेच रायगड जिल्ह्यातील मुरुड, अलिबाग, पेण, पनवेल, रोहा, कर्जत, नागोठणे, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, खोपोली, सुधागड, महाड, उरण, खालापूर, तळा इत्यादी तालुक्यातून विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. मुरुड व अलिबाग तालुक्यातील विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवलेले आहेत. (वयोगट मुले व मुली १४, १७, १९)अनुज भोईर प्रथम क्रमांक (नज हायस्कूल), ग्रीष्म राऊळ प्रथम क्रमांक (नज हायस्कूल), सानिया फुलारे प्रथम क्रमांक (कोएससो. वि.म.पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), आदित्य कांबळे प्रथम क्रमांक (सुविध्या स्कूल), नहुष पवार द्वितीय क्रमांक (नचिकेतास हायस्कूल विहूर), नेहाल घोले द्वितीय क्रमांक (कोएससो.वि.म.पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), पर्वणी चोर्घे द्वितीय क्रमांक (कोएससो. वि.म.पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), पायल सुतार द्वितीय क्रमांक (कोएससो. वि.म.पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), आयुब उल्डे द्वितीय क्रमांक (नज हायस्कूल), पायल राठोड तृतीय (कोएससो, वि.म.पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), सूरज कोहली तृतीय (कोएससो. वि.म.पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), श्रृष्टी कांबळे तृतीय (कोएससो. स. रा. ते. विद्यालय, रेवदंडा), सानिया पिळणकर तृतीय (कोएससो. स.रा. ते.विद्यालय, रेवदंडा). तांजिला मुक्रिरे तृतीय (रेवदंडा), परशुराम झावरे तृतीय (रेवदंडा), भावार्थ पाटील तृतीय (रेवदंडा), तनिष पाटील तृतीय (अलिबाग), परी नाकवा तृतीय (चिंतामणी केळकर विद्यालय अलिबाग), या सर्व विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षक सिहान-नंदकुमार वरसोलकर, सनी खेडेकर, अरविंद भोपी, ओंकार वरसोलकर, शिवम सिंह व क्रीडा शिक्षक इत्यादींनी मार्गदर्शन केले आहे.

डेव्हिड वॉर्नरचे द्विशतक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलियाचा स्टार सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने क्रिकेट विश्वात इतिहास रचताना एक मोठा विक्रम केला आहे. त्याने आपला १००वा कसोटी सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला, ज्यामध्ये त्याने द्विशतक झळकावले. सध्या ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या संघामध्ये कसोटी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील बॉक्सिंग डे कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या डविड

वॉर्नर याने एक दैदिप्यमान कामगिरी केली आहे. त्याने आपल्या १००व्या कसोटी सामन्यात शतक झळकावत मैलाचा दगड पार केला. अशी कामगिरी करणारा तो जगातील १०वा तर ऑस्ट्रेलियाचा दुसरा फलंदाज ठरला आहे.

आता वॉर्नरने कारकिर्दीतील १०० व्या कसोटीत शतक झळकावून हा विक्रम केला आहे. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील मालिकेतील दुसरा कसोटी सामना मेलबर्नमध्ये खेळला जात आहे. या सामन्यात वॉर्नरने ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात द्विशतक झळकावले आहे. त्याने २५४ चेंडूत २०० धावांची खेळी खेळली. यादरम्यान वॉर्नरने दोन षटकार आणि १६ चौकार लगावले.

दीपक फाऊंडेशनतर्फे क्रीडा स्पर्धा

। खांब-रोहा । वार्ताहर ।

दीपक फाऊंडेशन अंतर्गत प्रकल्प विवेक विद्याच्या अंतर्गत रोहे तालुक्यातील विविध गावांमध्ये मोठ्या उत्साहात क्रीडा स्पर्धा संपन्न करण्यात आल्या.

१७ डिसें.ते २४ डिसें. या कालावधीत तालुक्यातील उडदवणे, बाहे, देवकान्हे, धानकान्हे, धानकान्हे वाडी, चिल्हे, तळवली वाडी, नडवली, खैरवाडी, किल्ला, महादेववाडी, वाशी, लांढर, तळाघर या गावच्या मुलांचा व तिथे कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी या क्रीडा स्पर्धेचा समावेश करण्यात आला होता. या मुलांसोबत कब्बडी, क्रिकेट, डॉच बॉल, रिले यांसारखे खेळ घेण्यात आले. या स्पर्धेत ४०० मुले, पालक, शिक्षक व गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पो.पाटील व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि दीपक फाऊंडेशनची पूर्ण टीम यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी योगेश बामुगडे, सिद्धी भगत, गितेश भगत यांचे विशेष सहकार्य लाभले.

धर्माधिकारी कॉलेजात वार्षिक क्रीडा स्पर्धा

। कोलाड । वार्ताहर ।

कोलाड येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचालित डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवे कोलाडचे संस्थेचे संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २७ रोजी वार्षिक क्रीडा स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी अजित तेलगे, प्रा. डॉ. शंकर मुंडे, अमोल गोलीपकार, डॉ. आमलपुरे सूर्यकांत, सुबोध महाडिक आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात क्रीडामशाल पेटवून करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. माली दर्शना, प्रास्ताविक डॉ. आमलपुरे सूर्यकांत तर आभार प्रा. हर्णेकर निखिल यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

इमेज कॅलेंडरचे प्रकाशन

अलिबाग : इमेज कॅलेंडर २०२३ प्रकाशन सोहळा अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या हस्ते आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर माजी नगरसेवक प्रदिप नाईक, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक माजी अध्यक्ष सुरेश पाटील, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील, रमेश कांबळे, जितेंद्र शिगवण, समीर मालोदे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या मुलांची विजयी सलामी

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्राच्या मुलांनी फ गटात विजयी सलामी देताना तमीळनाडूला ४१-४० असे चकविले. झारखंड राज्य कबड्डी असो.च्या विद्यमाने बोकारो येथील एम जी एम हायर सेकंडरी शाळेच्या क्रीडांगणावर आजपासून ३२व्या किशोर/किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेला सुरूवात झाली आहे. शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावेधक ठरलेल्या या सामन्यात मध्यांतराला महाराष्ट्र २२-२६ असा ४ गुणांनी पिछाडीवर पडला होता. उत्तरार्धात टॉप गिअर टाकत महाराष्ट्राने तामिळनाडूच्या घशातून सामना खेचून आणला. तामिळनाडूची शेवटची चढाई असताना महाराष्ट्र ४१-३८ असे आघाडीवर होते. पण त्या चढाईत महाराष्ट्राचे दोन खेळाडू बाद झाल्याने महाराष्ट्राला एका गुणांच्या फरकावर समाधान मानावे लागले. संदेश बिल्ले, श्रीधर कदम, दिघु दहातोंडे यांनी उत्तरार्धाच्या खेळात केलेल्या झंजावाती चढयामुळे महाराष्ट्राने हा विजय साकारला. त्यांना विजय तारे यांनी भक्कम बचाव करीत उत्तम साथ दिली.

सिकाई मार्शल आर्ट स्पर्धेत अलिबागच्या खेळाडूंचा डंका

। रेवदंडा । वार्ताहर ।

शालेय राज्यस्तरीय सिकाई मार्शल आर्ट स्पर्धा ठाणे येथे संपन्न झाली या स्पर्धेत रायगड जिल्हा तसेच मुंबई विभाचे नैत्रुत्व करत ११ अलिबागच्या खेळाडूंनी दोन सुवर्ण पदक एक रौप्य पदक व पाच कांस्य पदक अशी नैत्रदीप कामगिरी केली. आय ई एस माध्यमिक शाळा वरसोली येथील शिकत असलेली अवनी राजेंद्र कवळे १४ गटात १ सुवर्ण पदक जेएसएममध्ये शिकत असलेला सिध्दार्थ अशोक पाटील सुवर्ण पदक, वरद संदिप वर्तक रौप्य पदक, नम्रता गणेश चव्हाण कांस्य पदक, नमिता नाईक कांस्य पदक, सानिया जालिंदर कांस्य पदक, शुभ रामचंद्र सारंग कांस्य पदक, भार्गवी प्रकाश नाईक कांस्य पदक, ऋषी नरेंद्र गावडे, संचिता नारायण थिटे, पार्थ संजय म्हात्रे या सर्व खेळाडुंना विजय तांबडकर प्रियंका संदेश गुंजाळ, सिद्धेश सतविडकर, शुभम महेंद्र नखाते, वेदांत संदेश सुर्वे, माही खमिस, विराज साखरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

वक्तृत्व स्पर्धेत सहभाग

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ येथील मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे आंतर महाविद्यालयात राज्यस्तरीय वत्कृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातील २२ महाविद्यालयांचे टीम सहभागी झाल्या होत्या.

या महाविद्यालयाकडून दरवर्षी आंतर महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले जाते. नेहमीप्रमाणे राज्यातील महाविद्यालयांच्या टीम यांना स्पर्धेसाठी निमंत्रण देण्यात आले होते. त्यानुसार या वक्तृत्व स्पर्धेसाठी मुंबई, पुणे, चिपळूण, कोल्हापूर, महाड, शहापूर, मुरबाड येथून २२ महाविद्यालये यांचे स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन विवेक पोतदार यांचे हस्ते झाले. यावेळी मिलिंद पोतदार, प्रा.नंदकुमार इंगळे उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण विशाल उशिरे, प्रवीण शिंदे यांनी केले.

वक्तृत्व स्पर्धेत प्रथम पारितोषिक यश पाटील, यश पाटील या विद्यार्थ्याने पटकावले. तर तेजस पाटील याने दुसरा तर संकेत पाटील हा विद्यार्थी तिसऱ्या क्रमांकावर राहिला. मयूर नरुटे, ज्योत्स्ना ठाकरे, मानसी गडगे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

सीमा वाद सोशल मीडियावर ट्रेंड

वर्षा मेहता
। अलिबाग ।

महाराष्ट्र विधानसभेने २७ डिसेंबर २०२२ रोजी कर्नाटकातील ८६५ मराठी भाषिक गावे राज्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी कायदेशीररीत्या पाठपुरावा करण्याचा ठराव एकमताने मंजूर केला, दोन्ही राज्यांमधील सीमावादाच्या वादात. नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बेळगावी, कारवार, निपाणी, बिदर भालकी आदी भाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात खटला लढवण्याचा ठराव मांडला.

केंद्रीय गृहमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकारने कर्नाटक सरकारला विनंती करावी आणि कर्नाटक सरकारने आपल्या राज्यातील मराठी भाषिकांच्या सुरक्षेची खात्री करावी, असे एकमताने मंजूर झालेल्या ठरावात म्हटले आहे. १४ डिसेंबर रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले होते की, सर्वोच्च न्यायालय निकाल देत नाही तोपर्यंत दोन्ही राज्ये एकमेकांवर कोणताही दावा करणार नाहीत.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील वादग्रस्त जिल्हे केंद्राच्या अधिपत्याखाली आणावेत, अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केल्यानंतर एका दिवसात हा ठराव आणण्यात आला. २६ डिसेंबर रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेत बोलताना ठाकरे यांनी शिंदे यांच्या 'निष्क्रियते'वर सडकून टीका केली होती.

SOCIAL MEDIA पडसाद

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)